सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १० फेब्रुवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## राष्ट्रपती मुर्मूंनी महाकुंभात केले स्नान





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०प्रयागराज**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज (सोमवार १० फेब्रुवारी २०२५) महाकुंभमेळ्यात येऊन संगमावर स्नान केले. राष्ट्रपतींनी संगमाच्या पवित्र पाण्यात तीन वेळी डुबकी मारली. तसेच सूर्यदेवाला अर्घ्य अर्पण केले. यानंतर राष्ट्रपतींनी गंगा पूजन आणि आरती केली. स्नानानंतर राष्ट्रपतींनी अक्षयवट आणि लेटे हनुमान मंदिरात जाऊन दर्शन घेतले. राष्ट्रपतींसोबत राज्यपाल आनंदीबेन पटेल आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ होते.

राष्ट्रपतींचे हेलिकॉप्टर नियोजीत कार्यक्रमानुसार सकाळी साडेनऊ वाजता बमरौली विमानतळावर उतरले. राज्यपाल आनंदीबेन पटेल आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी राष्ट्रपतींचे स्वागत केले. तिथून अरैल येथे राष्ट्रपती पोहोचल्या. नंतर बोटीने राष्ट्रपती संगमावर पोहोचल्या. संध्याकाळी चार वाजेपर्यंत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू प्रयागराजमध्ये असतील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या स्वतंत्र भारताच्या पहिल्या राष्ट्रपती आहेत ज्यांनी महाकुंभात स्नान केले आहे. याआधी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी १९५४ मध्ये कुंभमेळ्यात स्नान केले होते.कुंभमेळा म्हणजे ठराविक आवर्तन काळानुसार पवित्र नद्यांच्या तीर्थक्षेत्री भरणारा हिंदू भाविकांचा मेळा आहे. दर तीन वर्षांनंतर एकदा या पद्धतीने बारा वर्षांत प्रयागराज, उज्जैन, नाशिक (त्र्यंबकेश्वर), हरिद्वार या चार वेगवेगळ्या तीर्थक्षेत्री पूर्ण कुंभमेळे होतात. दर सहा वर्षांनी हरिद्वार आणि प्रयागराज येथे अर्धकुंभमेळा होतो. बारा पूर्ण कुंभमेळे झाल्यावर १४४ वर्षांनंतर प्रयागराज येथे महाकुंभमेळा होत आहे. यामुळे प्रयागराजच्या महाकुंभमेळ्याला विशेष महत्त्व आहे.

## तुम्हाला यमुना मातेचा शाप लागला; राजीनामा द्यायला गेलेल्या मुख्यमंत्र्यांना नायब राज्यपालांनी हिणवले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०नवी दिल्ली**

दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांनी काल आपल्या मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. दरम्यान, त्या राजभवनात उपराज्यपालांना राजीनामा देण्यासाठी गेल्या तेव्हा, उपराज्यपाल व्हीके सक्सेना यांनी यमुनेच्या प्रदूषणावरून त्यांच्यावर टीका केली. ते म्हणाले की, तुम्हाला यमुना मैय्याने शाप दिला आहे. यमुना स्वच्छ करण्यासाठी सरकारने सक्रिय पावले उचलायला हवी होती.



सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एलजी सक्सेना यांनी आतिशी यांना सांगितलं की, सर्वोच्च न्यायालयाने नदी स्वच्छ करण्याचा प्रकल्प थांबवल्यानंतर त्यांनी आपचे संयोजक अरविंद केजरीवाल यांना 'यमुनेच्या शापाबद्दल' इशारा दिला होता. तथापि, एलजीसमोर आतिशीने यावर कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही.

टीओआयच्या मते, हा वाद दोन वर्षे जुना आहे. जानेवारी २०२३ मध्ये, राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने यमुनेचे प्रदूषण कमी करण्यासाठी उपराज्यपालांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली. समितीने आपले काम सुरू करताच, केजरीवाल यांनी आपला पाठिंबा व्यक्त केला आणि मदत देऊ केली. तथापि, दिल्ली सरकारने नंतर एनजीटीच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले,

वरिष्ठ वकील एएम सिंघवी यांनी असा युक्तिवाद केला की डोमेन तज्ञाने पॅनेलचे नेतृत्व करावे. ही बंदी गेल्या दोन वर्षांहून अधिक काळापासून लागू आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर केजरीवाल यांच्याशी झालेल्या बैठकीत व्हीके सक्सेना यांनी सांगितलं होतं की त्यांना यमुनेच्या शापाचा सामना करावा लागेल.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी चार दिवसीय अमेरिका, फ्रान्स दौऱ्यासाठी रवाना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०नवी दिल्ली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी फ्रान्स आणि अमेरिकेच्या चार दिवसीय दौऱ्यासाठी रवाना झाले. फ्रान्समध्ये ते एआय एक्शन समिटमध्ये सहभागी होणार आहेत. या समिटचे पंतप्रधान मोदी हे सहअध्यक्ष असतील. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मॅक्रो पहिल्या भारतीय वाणिज्य दूतावासाचं उद्घाटन करतील. याशिवाय आंतरराष्ट्रीय थर्मोन्युक्लिअर प्रायोगिक रिएक्टर परियोजनेचा दौरा करण्यासाठी ते मार्सिलेला जाणार आहेत. फ्रान्सनंतर ते राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या निमंत्रणावरून अमेरिकेच्या दोन दिवसीय दौऱ्यावर जातील.

डोनाल्ड ट्रम्प हे दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर पंतप्रधान मोदींचा हा पहिलाच अमेरिका दौरा आहे. हा दौरा दोन्ही देशांच्या संबंधांच्या यशाला आणखी पुढे नेण्याची संधी असल्याचं मोदींनी म्हटलंय. फ्रान्स दौऱ्यावर रवाना होण्याआधी पंतप्रधान मोदी म्हणाले की, या दौऱ्यामुळे व्यापार, उद्योग, संरक्षण, उर्जा आणि पुरवठा साखळीची लवचिकता यासह वेगवेगळ्या क्षेत्रात अमेरिकेसोबत भारताची भागिदारी वाढवण्यासाठी आणि



सबंध दृढ करण्यास अजेंडा विकसित करण्यासाठीही मदत मिळेल असा विश्वास मोदींनी व्यक्त केला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिका दौऱ्याबद्दल बोलताना म्हटलं की, आम्ही दोन्ही देशांच्या लोकांच्या हितासाठी मिळून काम करू आणि जगासाठी चांगल्या भविष्याला आकार देऊ. मी माझे मित्र राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना भेटण्यासाठी उत्सुक आहे. भारत आणि अमेरिका यांच्यात व्यापक जागतिक धोरणात्मक भागिदारीसाठी त्यांच्या पहिल्या कार्यकाळात काम केल्याच्या चांगल्या आठवणी माझ्याकडे आहेत.फ्रान्स दौऱ्याबद्दल बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, तिथे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या निमंत्रणावरून फ्रान्सचा दौरा करत आहे. एआय एक्शन समिटचं सहअध्यक्षपद भूषवण्यासाठी उत्सुक आहे. सर्वसमावेशक, सुरक्षित आणि विश्वासार्ह, सर्वांच्या भल्यासाठी एआय तंत्रज्ञानाच्या सहकार्यात्मक दृष्टीकोनाच्या विचारांचं आदान प्रदान करू.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी घेतली राज ठाकरेंची 'शिवतीर्थ' या निवासस्थानी भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या 'शिवतीर्थ' या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही भेट झाल्याने राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चांना उधाण आल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान या भेटीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या भेटीमागचं कारण सांगितलं आहे. ही भेट राजकीय नव्हती असं फडणवीस म्हणाले आहेत.



राज ठाकरे यांची भेट घेतल्याबद्दल विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ही कुठलीही राजकीय भेट नाही, मी मुख्यमंत्री झाल्यानंतर राज ठाकरे यांचा अभिनंदनाचा फोन आला, तेव्हा मी त्यांना सांगितलं होतं की मी घरी येईन, त्याप्रमाणे मी घरी गेलो होते. ब्रेकफास्ट केला गप्पा मारल्या. या बैठकीचा कुठलाही राजकीय संदर्भ नाही. केवळ मैत्रीकरिता मी त्यांच्या घरी गेलो होते.महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि महायुतीचा ऐतिहासिक विजय झाला. या विजयावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी संशय व्यक्त केला होता. त्यानतंर मनसे-महायुतीच्या नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपांचे राजकारण सुरू झाले. यादरम्यान आज सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी आज शिवतीर्थावर जाऊन मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चा सुरू झाल्या होत्या. या दोन प्रमुख नेत्यांची सुमारे तासभर तरी बंद दाराआड चर्चा झाली.मुख्यमंत्री झाल्यानंतर फडणवीसांची भेट झाली नव्हती. आजची भेट ही सदिच्छा भेट होती, यामध्ये राजकीय असं काही नव्हतं, अशी प्रतिक्रिया मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींबद्दल काही चर्चा झाली का? या बद्दल विचारले असता देशपांडे म्हणाले की, आज काय बोलणं झालं याची मला कल्पना नाही. आजची भेट राजकीय नव्हती सदिच्छा भेट होती. राज ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांचे जुने संबंध आहेत. दोन्ही नेत्यांच्या राजकीय भूमिका वेगळ्या असू शकतात पण राजकारण्यांचे वैयक्तिक संबंध असतात, असेही संदीप देशपांडे म्हणाले.

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांना सर्वोच्च न्यायालयाचा मोठा दिलासा

### १४ तारखेच्या अविश्वास सभेला सर्वोच्च न्यायालयाची स्थगीती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

सत्ताधाऱ्यांनी उपविधीतील सूचविलेल्या दुरुस्त्या फेटाळात नाही तर त्यांच्या पाच संचालकांविरोधातील अविश्वास प्रस्तावाला मान्यता दिल्यानंतर आता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष माजी आमदार बच्चू कडू यांच्यावर विरोधकांनी थेट वार केला आहे. त्यांच्या एका याचिकेवर विभागीय सहनिबंधकांनी अध्यक्ष बच्चू कडू यांना संचालक पदावरून अपात्र करण्याबाबत नोटिस बजाविल्याने जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात खळबळ उडाली होती मात्र अमरावती जिल्हा बँकेतील १४ तारखेच्या अविश्वास सभेला सर्वोच्च न्यायालयाची स्थगीती मिळाली आहे.



जिल्हा मध्यवर्ती बँकेची सत्ता बच्चु कडू यांनी काबीज केल्यानंतर माजी अध्यक्ष बबलू देशमुख यांच्या गटाने सत्ताधाऱ्यांविरोधात तक्रारींचा सपाटा सुरू केला. सत्ताधाऱ्यांनी केलेल्या अनेक महत्वांच्या निर्णयांविरोधात विभागीय सहनिबंधकांसह सहकारमंत्री ते उच्च न्यायालयापर्यंतचा प्रवास या गटाने सुरू केला आहे. मागील महिन्यात सत्ताधऱ्यांनी सूचविलेल्या उपविधीतील दुरुस्त्यावर बबलू देशमुख गटाने आक्षेप घेतल्यानंतर त्या फेटाळण्यात आल्या आहेत. त्यानंतर लगेच सत्ताधारी गटातील पाच संचालकांविरोधात अविश्वास प्रस्तावाला न्यायालयाने हिरवी झेंडी दिल्याने विभागीय सहनिबधंकांनी येत्या १४फेब्रुवारीला अविश्वास ठरावाकरिता विशेष सभा बोलावली होती मात्र बच्चू कडू गटाच्या पाच संचालकांनी विरोधकां विरुद्ध सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.


उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला पुढील आदेशापर्यंत सुप्रीम कोर्टाने स्थगित दिलीआहे. संचालकांकडून संचालकांवरच अविश्वास आणण्याची ही देशातील पहिली घटना असावी असमत बच्चू कडू यांनी यावेळी व्यक्त केले.

## ग्रामीण भागात सेवा दिल्यानंतरच डॉक्टरांना मिळणार प्रमाणपत्र - आरोग्यमंत्री आबिटकर

### बंधपत्र सेवेबाबत डॉक्टरांवर कडक भूमिका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १०मुंबई**

वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलेल्या डॉक्टरांना सेवेच्या बंधपत्रानुसार एक वर्ष ग्रामीण भागातील सरकारी रुग्णालयात काम करावे लागते. परंतु अनेक डॉक्टर ग्रामीण भागात बाँडची सेवा करण्यास जात नाहीत. हे लक्षात घेऊन आरोग्य विभागाने कठोर भूमिका घेतली असून डॉक्टरांनी ग्रामीण भागात सेवा देणे गरजेचे असल्याचे सांगत ग्रामीण भागात एक वर्ष पूर्ण झाल्यानंतरच त्यांचे प्रमाणपत्र पोर्टलवर अपलोड करण्यात येणार असल्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.



एमबीबीएस, एमडी, एमएस इत्यादी पूर्ण केल्यानंतर डॉक्टरांना जिल्हा, उपजिल्हा, प्राथमिक आरोग्य केंद्र आदी ठिकाणी एक वर्ष सेवा करणे बंधनकारक आहे. एक वर्षाची सेवा न दिल्यास एमबीबीएस डॉक्टरांना १० लाख रुपये आणि एमडी, एमएस आदी पदवी असलेल्या डॉक्टरांना ५० लाख रुपये दंडाची तरतूद होती. मात्र, २०२२ नंतर राज्य सरकारने दंडाची तरतूद काढून टाकल्यानंतर एक वर्षाची सेवा अट पूर्ण करणे बंधनकारक केले. यानंतरही अनेक डॉक्टर ग्रामीण भागात जाण्यास टाळाटाळ करतात. यासाठीच ग्रामीण भागातील बंधपत्र सेवेबाबत डॉक्टरांवर कडक भूमिका घेतली जाणार असल्याचा आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.



सेंट्रल मार्डच्या निवासी डॉक्टरांनी सांगितले की, ग्रामीण भागात सुविधांचा अभाव आहे. निवास, खाण्यापिण्याबरोबरच वाहतुकीचीही समस्या आहे. या समस्यांमुळे डॉक्टर ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रात काम करण्यास टाळाटाळ करतात.त्यामुळे वैद्यकीय महाविद्यालयाकडून वाहनाची सोय करण्याचा निर्णय घेतला आहे.

## उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या आभार दौऱ्यात उद्धवसेनेच्या माजी नगरसेवकांचा शिंदेसेनेत प्रवेश?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०नाशिक**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे येत्या १३ फेब्रुवारी रोजी नाशिकच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या या आभार दौऱ्यात उद्धवसेनेचे काही माजी नगरसेवक शिंदेसेनेत प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे.



विधानसभा निवडणुकीनंतर राजकीय कल बदल असून उद्धवसेनेतील अनेक माजी नगरसेवक शिंदे सेनेच्या संपर्कात आहेत. उद्धवसेनेबरोबरच काही अन्य पक्षाच्या माजी नगरसेवकांचाही प्रवेश सोहळा पार पडला असला तरी काही माजी नगरसेवक हे नाशिकमध्ये प्रवेश करण्याच्या मानसिकतेत आहेत. त्यामुळे येत्या १३ फेब्रुवारी रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नाशिक दौऱ्यात हा प्रवेश सोहळा होण्याची शक्यता पक्षाच्या सूत्रांनी वर्तवली आहे.राज्यात महायुतीची सत्ता आल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाशिक मध्ये आभार मानण्यासाठी येणार आहेत. यादरम्यान त्यांच्या सभाही होणार आहेत.

## संपादकीय ......

# 'एआय' क्षेत्रातील भरारीला पाठबळ !

चीन आणि अमेरिकेने आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. एआयच्या क्षेत्रातील जागतिक स्पर्धेत आपले स्थान भक्कम करण्यासाठी किंबहुना एआयचे जागतिक नेतृत्व करण्यासाठी भारतानेही जोरदार तयारी सुरू केली आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये एआयच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद जाहीर केली आहे. यामुळे एआय संशोधन, विकास आणि नवोपक्रमांना चालना मिळेल.

वर्तमान जगात शिक्षणापासून अंतराळापर्यंत, शेतीपासून व्यापारापर्यंत, उद्योगांपासून वाहतुकीपर्यंत सर्वदूर आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा (एआय) वापर झपाट्याने वाढत चालला आहे. या पार्श्वभूमीवर अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रासाठी कोणत्या तरतुदी केल्या जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. २०२३ मध्ये सरकारने कृषी, आरोग्य आणि शाश्वत शहरे या क्षेत्रांमध्ये एआय उत्कृष्टता केंद्रे स्थापन करण्याची घोषणा केली होती; पण त्यासाठी निधीची रक्कम तुलनेने कमी होती.

केंद्र सरकारने मार्च २०२४ मध्ये १० हजार ३७२ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पीय खर्चासह इंडिया एआय मिशनला मंजुरी दिली होती. सध्याच्या एआय परिसंस्थेतील त्रुटी दूर करणे आणि भारताला एआय तंत्रज्ञान आणि ॲप्लिकेशनच्या विकासाचे केंद्र म्हणून उदयाला येण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करणे हे याचे उद्दिष्ट होते. इंडिया एआय मिशन ७ प्रमुख आधारस्तंभांच्या माध्यमातून राबवले जात असून, एआय कॉम्प्युट पायाभूत सुविधांसाठी १० हजार जीपीयूची उपलब्धता निर्माण करणे, हा त्यापैकी एक प्रमुख आधारस्तंभ आहे.यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये अर्थमंत्री सीतारामन यांनी शिक्षण क्षेत्रात एआयच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद जाहीर केली आहे. यामुळे एआय संशोधन, विकास आणि नवोपक्रमांना चालना मिळेल. या तरतुदी भारताच्या तांत्रिक प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण आहेत. मागील अर्थसंकल्पांतील २५५ कोटींच्या तुलनेत या वर्षीच्या अर्थसंकल्पात अधिक निधीची तरतूद केली आहे, ही बाब स्वागतार्ह आहे. भारतातील एआय संशोधन आणि विकासामध्ये पायाभूत सुविधांचा भक्कम पाया घालणे हा त्याचा मुख्य उद्देश आहे, जेणेकरून भारतीय संशोधक आणि उद्योजकांना एआय तंत्रज्ञानामध्ये प्रावीण्य प्राप्त करता येईल. एआयच्या शक्तीचा पूर्णपणे वापर करण्यासाठी हा उपक्रम एक महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो. कौशल्य विकास केंद्रे आणि सेंटर ऑफ एक्सलन्स स्थापन करण्याची घोषणा यांकडे अर्थसंकल्पाआधी आलेल्या आर्थिक सर्वेक्षणाच्या पार्श्वभूमीवर पाहणे आवश्यक आहे. यामध्ये कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय व शिक्षण मंत्रालयाने तरुणांना रोजगारक्षम कौशल्ये उपलब्ध करून देण्यासाठी केलेल्या सर्व योजनांचे अद्याप अपेक्षित परिणाम मिळालेले नाहीत. त्याचप्रमाणे एआयचा वाढता प्रभाव लक्षात घेता या आधुनिक तंत्रज्ञानाचा पायाभूत अभ्यासक्रमात समावेश करण्याची शिफारस अनेक तज्ज्ञांकडून केली जात आहे. त्यावरून सध्या सुरू असणार्या प्रयत्नांना बरीच गती देण्याची गरज असल्याचे स्पष्ट होते. आर्थिक सर्वेक्षणानुसार, देशातील ६५.३ टक्के कर्मचार्यांकडे कोणत्याही प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण नाही. ही परिस्थिती बदलण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. गेल्या अर्थसंकल्पात ३० इंडिया इंटरनॅशनल स्किल सेंटर्स उघडण्याची घोषणा करण्यात आली होती; पण यातील केवळ दोनच कार्यरत आहेत आणि दोनवर काम सुरू आहे. एआय आणि इतर तांत्रिक बदलांसह जागतिक श्रम बाजारज्या गतीने बदलत आहे. त्या गतीने चालण्यासाठी मोठी मजल मारावी लागणार आहे.भारताला या क्षेत्रात जागतिक नेतृत्व करावयाचे असेल, तर एआयसाठी किमान एक अब्ज रुपयांची तरतूद करणे गरजेचे आहे. या निधीच्या आधारे एआयसाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यासाठी देशव्यापी प्रशिक्षण कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे. तसेच एआयसाठी मजबूत डेटा धोरण तयार करणे आणि डेटा गोपनियतेची हमी देणेही आवश्यक आहे. आज देशात एआय आधारित नवोपक्रमांना चालना देण्यासाठी स्टार्टअप्सना विशेष निधी आणि प्रोत्साहन देण्यात येत आहे; परंतु प्रगत राष्ट्रांच्या तुलनेने हे प्रमाण खूप कमी आहे. भारतात एआयचा वापर वैद्यकीय निदान आणि उपचारांसाठी मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. यासारख्या प्लॅटफॉर्मचा उपयोग मोठ्या प्रमाणावर करण्यात आला.

# राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत विद्यापीठातील साहील गावंडे, विवेक टोंगे यांच्या संशोधनाला पारितोषिक



## कुलगुरुंच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय संशोधन स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या साहील गावंडे आणि विवेक टोंगे या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नावीन्यपूर्ण संशोधन प्रकल्पाला २ पारितोषिके मिळाली आहेत. १७ व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठीय संशोधन संमेलन - आविष्कार २०२५ या स्पर्धेचे लोणेरे येथे आयोजन करण्यात आले होते. त्यात महाराष्ट्रातील २६ विद्यापीठांच्या ७७७ स्पर्धक विद्यार्थ्यांनी भाग घेतला. विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्तीला चालना मिळावी यासाठी आविष्कार ही आंतरविद्यापीठीय राज्यस्तरीय संशोधन स्पर्धा दरवर्षी आयोजित केली जाते.

या स्पर्धेत मानवविज्ञान, भाषा आणि ललित कला, वाणिज्य, व्यवस्थापन आणि विधी, मूलभूत विज्ञान, कृषी आणि पशूपालन, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, वैद्यकशास्त्र आणि औषधनिर्माणशास्त्र अशा सहा गटांमधून पदवी, पदव्युत्तर आणि पदव्युत्तरोत्तर स्तरांचे विद्यार्थी संशोधन प्रकल्प सादर करतात. सदर स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या ४६ विद्यार्थ्यांच्या चमूने ६ गटांतून संशोधनप्रकल्प सादर केलेत. दोन टप्प्यांमध्ये झालेल्या या स्पर्धेत पहिल्या टप्प्यात पोस्टर सादरीकरणातून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या १८ विद्यार्थ्यांची पोडियम प्रेझेंटेशनसाठी व दुस-या टप्प्यासाठी निवड झाली आणि त्यातून साहील गावंडे आणि विवेक टोंगे या विद्यार्थ्यांनी पारितोषिके प्राप्त केली. साहील गावंडे याने स्मार्ट सिस्टिम फॉर थ्रेशिंग मशीन या विषयावर संशोधन प्रकल्प सादर करीत कृषी आणि पशूपालन पदवी गटातून तृतीय क्रमांक (विभागून) प्राप्त केला. तर विवेक टोंगे याने बॅटरी कुलिंग सिस्टिम फॉर इलेक्ट्रिक व्हेईकल या विषयावर संशोधन प्रकल्प सादर करत अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान - पदव्युत्तरोत्तर गटातून द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

विजेत्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी, मेडल, प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. या विद्यार्थ्यांना संशोधनकार्य पुढे नेण्यासाठी शिष्यवृत्ती स्वरूपात आर्थिक साहाय्य देखील मिळणार आहे.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दलल कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, न.न.सा. संचालक डॉ. अजय लाड, आविष्कार समन्वयक डॉ. वैशाली धनविजय, मार्गदर्शक श्री. विवेक देशमुख, श्री. स्वप्नील शेळके,संघ व्यवस्थापक डॉ. संयोगिता देशमुख, डॉ. प्रणव कोलते तसेच प्रशासकीय सहकारी श्री. राजेश भोयर, गृहविज्ञान विभागातील शिक्षक श्री. सुमित गेडाम, श्री. सुमेध वडूरकर, श्री. अशोक हिरे, पालक श्री व सौ. गावंडे उपस्थित होते. विद्यार्थ्यांवर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# उन्हाळी हंगामात फायद्याची फळभाजी 'कारले'; कशी कराल लागवड?

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक -** चवीला कडू असल्यामुळे कारल्याच्या भाजीला नाक मुरडले जाते. अत्यंत कडू असले तरी त्यातील कर्बोदके, प्रथिने, खनिजे, 'अ' आणि 'क' जीवनसत्त्व यामुळे आरोग्याच्या दृष्टीने आवर्जून कारल्याची भाजी खाल्ली जाते. त्यामुळे कारल्यासाठी बाजारात चांगली मागणी आहे. खरीप, तसेच उन्हाळी हंगामात कारल्याची लागवड करण्यात येते. उष्ण व दमट हंगामातील पीक असून, कडाक्याच्या थंडीचा पिकाच्या वाढीवर परिणाम होतो.

**आवश्यक हवामान**

फुले आणि वाढीसाठी २५-३० अंश सेल्सिअस तापमान फायदेशीर ठरते. कमी तापमान आणि जास्त पाऊस असलेल्या भागातही लागवड करता येते. ३५ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमानात मादी फुले, फळधारणा आणि झाडाच्या वाढीवर परिणाम होतो. विषाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढतो.

**लागवडीचा हंगाम**

उन्हाळी हंगाम जानेवारी ते मार्च, तर जास्त थंडी असल्यास फेब्रुवारी महिन्यात लागवड करावी. खरीप हंगामात जून-जुलैमध्ये लागवड करावी.

**लागवडीसाठी वाण**

कारले लागवडीसाठी काही सुधारित जातींची शिफारस करण्यात आली आहे. त्यामध्ये डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाने विकसित केलेले 'कोकण तारा' हे वाण चांगले पीक देणारे आहे.


**लागवड कशी करावी?**

- लागवडीसाठी दोन ओळींतील अंतर ३.५ ते ५ फूट आणि दोन वेलींतील अंतर २-३ फूट ठेवावे.

- लागवड साधारणपणे बियाणे टोकन पद्धतीने केली जाते.

- थंड हवामानात उगवण क्षमतेवर विपरीत परिणाम होत असल्याने हरितगृहामध्ये रोपवाटिका केल्यास अधिक फायदेशीर ठरते.

- अशा रोपांची पुनर्लागवड करावी. ऊबदार जमिनीत बियाणे टोकन पद्धतीने



लावल्यास ६-७ दिवसांत उगवून येतात.

- कारले लागवडीसाठी हेक्टरी १.५ ते २ किलो बियाणे लागते.

**पाणी व खत व्यवस्थापन**

- वेलवर्गीय पीक असून, कमी किंवा जास्त पाण्याचा ताण सहन होत नाही.

- फळधारणा अवस्थेत २-५ दिवसांनी गरजेनुसार पाणी दिल्याने उत्पादनामध्ये वाढ होते.

- प्रति हेक्टरी कुजलेले शेणखत २० टन वापरावे.

- तसेच नत्र, स्फुरद, पालाश खते प्रमाणात वापरावीत.

- मिश्र खतांचा वापर उत्पादन वाढीसाठी फायदेशीर ठरतो.

**आंतरमशागतीची कामे**

- लागवडीनंतर १५-२० दिवसांच्या अंतराने खुरपणी करून वेली भोवतीची तणे काढून घ्यावी.

- कारली हे वेलवर्गीय पीक असून, वेलींना आधार दिल्यास त्यांची वाढ चांगली होते.

- नवीन फुटीच्या वाढीला चांगला वाव मिळतो.

**कीड-रोग व्यवस्थापन**

- कारले पिकावर प्रामुख्याने भुरी, केवडा रोग तसेच तांबडे भुंगेरे, फळमाशी, मावा, पांढरी माशी तसेच पाने-फळ पोखरणारी अळी आणि पाने खाणारी अळी यांचा प्रादुर्भाव होतो.

- किडीच्या बंदोबस्तासाठी पिवळे निळे चिकट सापळे लावावे.

- लागवडीपासून ६०-७५ दिवसांत कारली काढणीसाठी तयार होतात.

- चवीला कडू असले तरी त्यातील गुणधर्मामुळे वाढती मागणी होत आहे.









# नखे देतात आरोग्याविषयीचे संकेत; जाणून घ्या नखांविषयीचे आजार, लक्षणे आणि उपचार

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक** - हाता-पायांची नखे ही आरोग्याविषयीचे संकेत देत असतात. विशेषतः, शरीरातील काही पोषकतत्त्वांची कमतरता नखांमधून स्पष्ट दिसू शकते. फिकट, ठिसूळ किंवा पिवळसर नखे ही अनीमिया, थायरॉईड समस्या किंवा पोषणातील कमी दर्शवतात. काही आजारांची प्राथमिक लक्षणे नखांवरून समजू शकतात. पांढरे डाग, काळसर रेषा किंवा अतिशय मऊ नखे ही यकृत, मूत्रपिंड किंवा फुफ्फुसाच्या आजारांची लक्षणे असू शकतात. लोहाची कमतरता असेल तर नखे पातळ आणि ठिसूळ होतात. प्रथिनांची कमतरता असल्यास नखांवर रेषा दिसतात. कॅल्शियम आणि झिंकची कमतरता बहुतेकदा नखे तुटतात आणि त्यांची वाढ मंदावते. फंगल इन्फेक्शनमुळे नखे पिवळे आणि जाडसर होतात. नखांखालील काळ्या रेषा काही वेळा रक्ताभिसरणातील समस्या किंवा त्वचेच्या आजारांशी संबंधित असू शकतात. याउलट मजबूत आणि निरोगी नखे असणे म्हणजे शरीर निरोगी असल्याचा संकेत असतो.



**बुरशीजन्य संसर्ग (फंगल इन्फेक्शन):**

बुरशीजन्य संसर्गामुळे नखे पिवळी, जाड आणि ठिसूळ होतात. सार्वजनिक ठिकाणी अनवाणी चालणे, ओलसर वातावरण, आणि स्वच्छतेची कमतरता यामुळे हा संसर्ग होऊ शकतो.

लक्षणे : नखांचा रंग बदलणे, जाड होणे, तुटणे, आणि दुर्गंधी येणे.

उपचार : अँटी-फंगल औषधे, मलम डॉक्टरांच्या सल्ल्याने वापरावे.

ठिसूळ नखे

शरीरात कॅल्शियम, लोह, आणि प्रोटिनची कमतरता, तसेच बाह्य रसायनांचा संपर्क यामुळे नखे ठिसूळ होतात.

लक्षणे : नखे सहज तुटणे, पातळ होणे.

उपचार : आहारात प्रथिने, लोह, आणि कॅल्शियमयुक्त पदार्थांचा समावेश करावा.

**नखांवरील रेषा (मेलानोमा)**

नखांखालील त्वचेतील रंगद्रव्यांच्या पेशींची अनियंत्रित वाढ झाल्यामुळे ही स्थिती उद्भवते.

**लक्षणे** : यामध्ये नखांवर काळ्या किंवा तपकिरी रेषा दिसणे, नखांच्या आकारात बदल होणे आणि वेदना होणे.

उपचार : त्वरित त्वचारोग तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. लवकर निदान केल्यास उपचार प्रभावी ठरतात.

**लाईकेन प्लानस-** ही एक प्रतिकारशक्तीशी संबंधित त्वचेची समस्या आहे, ज्यामुळे नखांवर परिणाम होतो.

**लक्षणे** : नखांवर खड्डे पडणे, तुटणे, आणि नखांचा रंग बदलणे.

**उपचार**: आयुर्वेदिक उपचारांमध्ये कडूलिंबाचे तेल, कोरफडीचा गर, आणि त्रिफळा चूर्ण यांचे मिश्रण नखांवर लावणे उपयुक्त ठरते.

**नखांचे आरोग्य टिकवण्यासाठी टिप्स**

स्वच्छता : नखे स्वच्छ आणि कोरडी ठेवा. हाताची बोटे, नखे साबण, सॅनिटायजर, हँडवॉश आणि पाण्याने धुवा.

**आहार** : प्रथिने, लोह, आणि कॅल्शियमयुक्त पदार्थांचा आहारात समावेश करा.

रसायनांच्या संपर्कापासून नखांचे संरक्षण करा. घरकाम करताना हातमोजे वापरा. नखांमध्ये कोणतेही बदल दिसल्यास त्वचारोग तज्ज्ञांचा सल्ला घ्या. नखे नियमितपणे स्वच्छ करणे आणि कोरडी ठेवणे आवश्यक आहे. नखे केवळ सौंदर्यासाठी नसून, त्यांचे शरीराच्या आरोग्यासाठीही महत्त्वाचे कार्य असते.

# हळदी कुंकवाच्या कार्यक्रमानिमित्त महिलांना उद्योगाचे प्रशिक्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

सुरेखाताई ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली लक्ष प्रतिष्ठानचे वतीने संक्रांतीनिमित्त विविध गावांमध्ये हळदी कुंकवाचे कार्यक्रम संपन्न होत आहे. चांदूरबाजार तालुक्यातील विविध गावांमध्ये संक्रांतीनिमित्त महिलांच्या हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन जवळा शहापूर येथे करण्यात आले. गावातील मंदिरामध्ये सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित महिलांना विविध उद्योगाचे मार्गदर्शन करण्यात आले. गावातील कष्टकरी सर्वसामान्य महिलांनी वेळोवेळी सुरेखा ताईंकडे उद्योग निर्मितीची मागणी केलेली होती हळदीकुंकवाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्हा उद्योग केंद्राचे मार्गदर्शक श्री. नेत्रदीप चौधरी यांनी विविध उद्योगाबाबत सविस्तर माहिती दिली. गाव पातळीवर उपलब्ध असलेल्या विविध कच्च्या मालापासून उद्योग निर्मितीकरिता आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.



त्याचप्रमाणे जिल्हा उद्योग केंद्र, ग्रामोद्योग केंद्र व विविध शासकीय योजनांमधून उपलब्ध अनुदानाविषयी माहिती देण्यात आली. पारंपारिक हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने महिलांनी एकत्र येत विविध उद्योग सुरू करण्याविषयी संकल्प केला. सर्व महिलांनी श्रीमती सुरेखाताई ठाकरे यांचे आभार व्यक्त केले.या कार्यक्रमाकरिता शोभनाताई देशमुख जिल्हा अध्यक्ष रा कॉ सुषमा ताई बर्वे अनुश्री निखिल ठाकरे,कार्याध्यक्ष रंजना पाथरे,तालुका अध्यक्ष वनिता धरपाल ,शुभांगी ठाकरे,वैशाली विधळे, ग्रा.प. सदस्य वंदना चौधरी, ग्रा.प सदस्य अर्चना वानखडे, ग्रा.प सदस्य शारदा विधळे,सुषमा मेश्राम, मीनल अक्षय पाथरे, ज्योत्सना ठाकरे, ममता हिवसे, बबीता मेश्राम,गायत्री ठाकरे, शारदाताई भोकरे, संध्या पाथरे, छोटी सोलव,प्रतिभा घावट,चंदा नवले, मीनाताई ठाकरे, हरीदिनी नवले,अनिता सुळे त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. १० फेब्रुवारी २०२५ शहर/ग्रामिण



# राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे कार्य दुर्गम भागात पोहोचवणार

## मी पाहुणा नाही मी अमरावती जिल्ह्याचा-न्यायमूर्ती भूषण गवई

### लाभार्थ्यांना लाभाचे वाटप, योजनांच्या माहिती साठी स्टॉल





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१० धारणी–** येत्या काळात राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे कार्य देशभरातील दुर्गम भागात पोहोचवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. यासाठी राज्य शासनाचे सहकार्य घेण्यात येत असून त्यांच्या मदतीने शासकीय सेवा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासोबतच त्यांना लाभ देण्यात येत आहे, अशी माहिती सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी दिली.राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा. मुंबई यांच्या वतीने आयोजित धारणी येथे विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय योजनांचा महामेळावा आज पडला. यावेळी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती न्यायमूर्ती अभय ओक, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, न्यायमूर्ती अतुल चांदूरकर, न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे, उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूरचे वरिष्ठ प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे, पालक न्यायमूर्ती वृषाली जोशी, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, इंद्रजीत महादेव कोळी, ड राजीव गोंडाणे, नवनियुक्त न्यायमूर्ती प्रवीण पाटील आदी उपस्थित होते.श्री. गवई म्हणाले, मेळघाट परिसर हा निसर्ग संपन्न आहे. या भागात आदिवासी समाज बहुसंख्येने आहे. त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी शिबिर घेण्यात आले आहे. या शिबिराचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी प्रशासनाने सहकार्य करावे. समाजात राजकीय समता प्रस्थापित करण्यासाठी राज्यघटनेने संरक्षण दिले आहे. देशात ७५ वर्षे संविधानाने पूर्ण केले आहे. त्यामुळे देशात लोकशाही प्रस्थापित झाली आहे. मात्र समाजात सामाजिक आणि आर्थिक समानता प्रस्थापित होणे गरजेचे आहे. राज्यघटनेत समानतेचे संरक्षणासाठी मूलभूत तत्वे आणि अधिकार दिले आहेत. त्यानुसार न्यायालय निर्णय देत आहे. देशात समानतेचे वातावरण निर्माण होण्यासाठी चांगल्या वैद्यकीय सुविधा, शिक्षण, रोजगाराच्या संधी, दिव्यांगांना मदत देऊन दरी मिटवण्याचे कार्य करावे.श्री. ओक यांनी राज्यघटनेने कल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाचा विकास करताना निवास, आरोग्य आणि त्याच्या उत्पन्नाची साधनाची सुविधा निर्माण करणे गरजेचे आहे. त्यामुळे शासनाने मूलभूत सुविधा पोहोचवून कुपोषणासारखा प्रकार प्रभावीपणे हाताळावा. शासकीय योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विद्यार्थ्यांचे सहकार्य घेण्यात यावे, असे आवाहन केले.श्री. आराधे यांनी, लोकअदालतीच्या माध्यमातून सामंजस्याने न्याय मिळवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. श्री. चांदूरकर यांनी धारणी येथे न्याय मेळावा आयोजित केला आहे. या ठिकाणी कायदेविषयकही सल्ला मिळणार आहेत. याचा उपयोग करून घ्यावा, असे आवाहन केले. श्रीमती ढेरे यांनी भारतात लोकशाहीचा पाया रुजला आहे. प्रत्येकाला न्याय मिळणे, ही सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. श्री. सांबरे यांनी कोणीही न्यायापासून वंचित राहू नये, यासाठी कार्य करावे, असे आवाहन केले. श्रीमती जोशी यांनी शिबिराच्या माध्यमातून न्याय नागरिकांच्या दारी पोहोचलो आहे. त्यामुळे याचा लाभ घेण्याचे आवाहन केले.जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दुर्गम भागात मेळावा आयोजित करण्यात आला आहे. प्रत्येकाला मदत मिळावी यासाठी प्रशासन कार्यरत आहे, असे सांगितले. श्री. यार्लगड्डा यांनी सामान्य नागरिकांच्या मदतीसाठी मेळावा आयोजित करण्यात आला असल्याचे सांगितले.यावेळी ज्योती पटोरकर, नारायण कासदेकर, मोहम्मद अरिफ अब्दुल हबीब, सतीश नागले, तरहाना शेख परवीन, आदर्श पटोलकर, अर्जुन पटोरकर, कमला जावरकर, रतई तारशिंगे, श्याम जावरकर, रामदास भिलावेकर, माही राठोड, पार्वती नागोरे यांना लाभाचे वाटप करण्यात आले.वनस्पतींना पाणी देऊन शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. सुरवातीला बरडा येथील समूहाने गजली सूसून आदिवासी नृत्याने स्वागत केले. जिल्हा परिषद महाविद्यालयाने स्वागत गीत सादर केले.

# पूर्णा नदीच्या पाण्यावर फुलवली कांदा गहू ज्वारीची शेती

## तीन किलोमीटर पाईप लाईन टाकून घेतले नदी पात्रातून पाणी

## खारपान पट्ट्याला आले अच्छे दिन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ दर्यापूर** – दर्यापूर



तालुक्यातील पूर्णा नदीच्या काठावर वसलेल्या जैतापूर येथील मूळचे रहिवासी व सद्यस्थितीत दर्यापूर येथे वास्तव्यास असलेले युवा शेतकरी सचिन बाळासाहेब टोळे यांनी शेतामध्ये पूर्णा नदी पात्रातुन तीन किलोमीटर अंतरावरून पाईपलाईन द्वारे पाणी घेऊन जिद्द व चिकाटी सोबत ठेवून दर्यापूर मूर्तिजापूर रोड लगत प्रत्येकी तीन एकरावर कांदा ,ज्वारी, गहू ,या पिकाची शेती फुलवली आहे नोकरीच्या मागे न लागता शेतीमध्ये पूर्ण मेहनतीने जीव ओतून घेतला आहे व शेती अधिक फुलवून आर्थिक उत्पादन कसे अधिक घेता येईल यावर विशेष भर त्यांनी दिला कांदा असे तीन पिकं घेण्याचा प्रयत्न यशस्वीरित्या होत असल्याचे दिसत आहे पीक परिस्थितीला दोष दिल्यापेक्षा आपल्याकडे असलेल्या उपलब्ध साधनसामग्रीचा वापर करून जिद्द व चिकाटी ठेवल्यास विविध ओलिताचे उत्पन्न घेणे शक्य होते तर पूर्णा नदी काठी जमीन आहे व आता यावर्षी त्यांनी प्रथमच मुर्तीजापुर दर्यापूर रोड लगत असलेल्या सहा एक्कर शेतामध्ये गहू ज्वारी चार एकरावर असलेल्यांना सुद्धा पाणी शेतात घेऊन ओलिताची शेती करता येते हे सचिन पाटील टोळे यांनी दाखवून दिले.

### अन्य शेतकऱ्यांनीही आता एक पाऊल पुढे यायला हवे

माझी शेती खारपाणपट्ट्यात असून या वर्षी प्रथमच हा प्रयोग केला आहे. त्यात चांगले यश आले. पुढेही शक्य झाल्यास धरणाच्या पाण्याच्या मदतीने शेतात नवनवीन प्रयोग करून उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करेन. परिसरातील अन्य शेतकऱ्यांनीही आपली आर्थिक क्षमता वाढवण्यासाठी धरणाच्या पाण्याचा उपयोग करत प्रयोगशील शेती करण्याचा प्रयत्न करावा.**–सचिन टोळे, शेतकरी.**

# जिल्हा बँक अध्यक्ष बच्चू कडू यांना सहकार विभागाची नोटीस

## विभागीय सहनिबंधकांनी दिला २४ फेब्रुवारीपर्यंतचा अवधी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती–**

सत्ताधाऱ्यांनी उपविधीतील सूचविलेल्या दुरुस्त्या फेटाळात नाही तर त्यांच्या पाच संचालकांविरोधातील अविश्वास प्रस्तावाला मान्यता दिल्यानंतर आता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष माजी आमदार बच्चू कडू यांच्यावर विरोधकांनी थेट वार केला आहे. त्यांच्या एका याचिकेवर विभागीय सहनिबंधकांनी अध्यक्ष बच्चू कडू यांना संचालक पदावरून अपात्र करण्याबाबत नोटिस बजाविल्याने जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे.जिल्हा मध्यवर्ती बँकेची सत्ता बच्चु कडू यांनी काबीज केल्यानंतर माजी अध्यक्ष बबलू देशमुख यांच्या गटाने सत्ताधाऱ्यांविरोधात तक्रारींचा सपाटा सुरू केला. सत्ताधाऱ्यांनी केलेल्या अनेक महत्वांच्या निर्णयांविरोधात विभागीय सहनिबंधकांसह सहकारमंत्री ते उच्च न्यायालया पर्यंतचा प्रवास या गटाने सुरू केला आहे. मागील महिन्यात सत्ताधऱ्यांनी सूचविलेल्या उपविधीतील दुरुस्त्यावर बबलू देशमुख गटाने आक्षेप घेतल्यानंतर त्या फेटाळण्यात आल्या आहेत. त्यानंतर लगेच सत्ताधारी गटातील पाच संचालकांविरोधात अविश्वास प्रस्तावाला न्यायालयाने हिरवी झेंडी दिल्याने विभागीय सहनिबधंकांनी येत्या १४फेब्रुवारीला अविश्वास ठरावाकरिता विशेष सभा बोलावली आहे. याच दरम्यान बबलू देशमुख गटातील संचालक हरीभाऊ मोहोड यांच्यासह ११ संचालकांनी बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांना बँकेच्या संचालक पदावरून अपात्र करण्याबाबतची याचिका दाखल केली. नाशिक जिल्हा न्यायालयाने त्यांना एका प्रकरणात एका वर्षाची शिक्षा ठोठावल्याचा दाखला त्यांनी यामध्ये दिला होता. बँकेच्या उपविधीत एक वर्षापेक्षा अधिक शिक्षा लागलेले संचालक हे या पदाकरिता अपात्र ठरतात, अशी उपविधीत तरतुद असल्याने या नियमांचा आधार घेत विभागीय सहनिबंधकांनी, आपणाला अपात्र का करण्यात येऊ नये, तसेच पुढील पाच वर्षांकरिता आपणास सदरचे पद धारण करण्यास अपात्र का करू नये, अशी नोटिस बँक अध्यक्ष बच्चू कडू यांना बजावली आहे. याकरिता त्यांना तोंडी म्हणणे मांडावयाचे असल्यास २४ फेब्रुवारी, रोजी दुपारी ३ वाजता साक्ष नोंदविण्याकरिता समक्ष अथवा प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून म्हणणे सादर करावे. आवश्यक पुराव्यासह मुदतीत समाधान कारक खुलासा सादर न केल्यास अथवा सुनावणीस अनुपस्थित राहिल्यास प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणावयाचे नाही, असे ग्राह्य धरून पुढील निर्णय घेण्यात येईल, असे नोटिसमध्ये नमुद करण्यात आले आहे.



# २४,८७१ विद्यार्थ्यांनी दिली शिष्यवृत्ती परीक्षा

## पाचवीचे १४,२५०, आठवीचे १०,६२१ विद्यार्थी उपस्थित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत इयत्ता पाचवी आणि आठवीसाठी घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षा ९ फेब्रुवारीला जिल्ह्यातील २१३ परीक्षा केंद्रावर पार पडली. यावेळी पाचवीचे १४२५० तर आठवीचे १०६२१ असे २४८७१ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते असे शिक्षण विभागाने सांगितले.

रविवारी जिल्ह्यातील इयत्ता पाचवीतील पेपर दोनला १४ हजार २५० विद्यार्थी हजर तर ५८७ गैरहजर होते. तर,आठवीमध्ये १ हजार ६२१ हजर तर ४५८ गैरहजर राहिल्याची माहिती जिल्हा परिषद शिक्षण विभागाने दिली आहे. या

# उशिरा जन्म-मृत्यूची नोंद आता झाली बंद

## प्रशासनाचा निर्णय : नागरिकांच्या अडचणीत वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती–** उशिरा जन्म-मृत्यू नोंदीबाबत शासनाने आदेश काढून तहसीलदारांमार्फत नोंदीचा अधिकार देऊन महत्त्वपूर्ण निर्णय घेतला होता. मात्र, शासनाने या निर्णयावर स्थगिती देत पुढील आदेशापर्यंत जन्म-मृत्यू नोंद बंद ठेवण्याचे आदेश काढून सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आदेश दिल्याने उशिरा जन्म-मृत्यू नोंद करणाऱ्यांमध्ये खळबळ माजली असून, त्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

भारत शासन राजपत्राद्वारे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा, १९६९ मध्ये सुधारणा करून उशिरा जन्म व मृत्यू नोंदणी संबंधीचे अधिकार हे जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी यांना प्रदान करण्यात आले होते. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला होता. मात्र, या सुधारणेनुसार उशिरा जन्म व मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाही संदर्भात शासनाकडे मोठ्या प्रमाणावर तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सदर तक्रारींची चौकशीकरण्याकरिता गृह विभागामार्फत विशेष तपासणी पथकाची (एसआयटी) स्थापना करण्यात आलेली आहे. सुधारणेनुसार उशिरा जन्म व मृत्यू प्रमाणपत्र वितरित करण्याची कार्यवाहीठप्प राहणार आहे.

### तक्रारींचा पडतोय पाऊस

उशिरा जन्म-मृत्यू नोंद जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. मात्र, या प्रक्रियेत त्रुटी असून, चुकीच्या पद्धतीने नोंद केल्या जात असल्याच्या अनेक तक्रारी शासनाला प्राप्त झाल्या. यात तक्रारींची संख्या लक्षणीय असल्याने प्रशासनाने या आदेशाला स्थगिती देत तक्रारींचा निपटारा करणार आहे व सत्यता जाणून पुढील आदेश देण्याचे संकेत आहेत.

### तक्रारींची चौकशी 'एसआयटी' करणार

१उशिरा जन्म व मृत्यू प्रमाणपत्र नोंदीबाबत राज्य शासनाकडे विविध जिल्ह्यांतून मोठ्या प्रमाणावर तक्रारी प्राप्त होत आहेत.

२ या तक्रारींची चौकशी गृह विभागामार्फत विशेष तपासणी पथकाद्वारे (एसआयटी) करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

# दर्यापुरात 'उबाठा'च्या ७५ पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

## पत्रकार परिषदेत शिवसेना आमदाराविरुद्ध एल्गार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०दर्यापूर–** तालुक्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शिक्सेना, युवासेना, सहकार सेना आदी आघाड्यांतील पदाधिका-यांनी सामूहिक राजीनामे दिल्याने राजकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाचा दर्यापूर मतदारसंघात आमदार निवडून आल्यानंतर या पक्षाचा विधानसभा क्षेत्रात चांगला बोलबाला निर्माण झाला होता. मात्र, रविवार (दि. ९) शिवसेना तालुका कार्यालयात पत्रकार परिषद घेत सामूहिक राजीनामे दिल्याचे जाहीर केले आहे. यामुळे राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली असून विविध चांना उधाण आले आहे.

शिक्सेनेचे आमदार गजानन लक्टे हे एकनिष्ठ जुन्या जाणत्या कार्यकत्यांना विश्वासात घेत नसून दुफळी निर्माण करत आहेत, असा आरोप पत्रकार परिषदेतून नाराज पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. दर्यापूर मतदारसंघात पक्षांतर्गत कार्यकारिणी व नवीन तालुका प्रमुख निवडताना जुन्या कार्यकत्यांना विश्वासात घेतले नसल्याने पक्षातील पदाधिकाऱ्यांची मने दुखावली असल्याचे सांगण्यात आले. शिवसेनेच्या ७५ जणांनी राजीनामे दिल्यानंतर हे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते कोणत्या पक्षात जाणार, याकडे आता सर्वांचेच लक्ष लागले आहे. विधानसभेत इमाने इतबारे पक्षाचे काम केले

पक्षाचा आमदार निवडून आणण्यासाठी प्रसंगी घरावरही तुळशीपत्र ठेवणारे आमचे कार्यकर्ते नवनिर्वाचित आमदारांच्या वर्तणुकीने दुखी झाले आहेत. पक्षाला मोठे करण्यासाठी तसेच निवडणुकीत आम्ही दिवस रात्र काम केले. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल आमची एकनिष्ठता कायम आहे. मात्र, आम्ही सर्वच पदाधिकारी सामूहिक राजीनामे देत असल्या च्या प्रतिक्रिया सहकार सेनेचे तालुका प्रमुख गणेशराव लाजूरकर , तालुका समन्वयक सतीश काळे, तालुका सरचिटणीस जमील पटेल यांनी दिल्यात.

### एकाही पदाधिकाऱ्याला पक्षातून काढले नाही जूतन कार्यकारिणी घोषित करणे

हे माझे काम नाही. पक्ष संघटनेतील कार्यकारिणी घोषित करताना जिल्हा प्रमुख, संपर्क प्रमुख व पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनातून कार्यकारिणी निवडली जाते. मी कोणत्याही कार्यकत्र्याला व पदाधिकाऱ्याला पक्षातून काढले नाही व काढणारही नाही. मी स्वतः अगोदर शिवसैनिक आहे नंतर आमदार. त्यामुळे पदाधिकारी व कार्यकत्यांचा माझ्यावर नाराजीचा कुठलाही संबंध येत नाही.आ. गजानन लवटे, दर्यापूर विधानसभा.

# अट्टल चोरट्यांच्या शोधासाठी गुन्हे शाखेचे पथक परराज्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती–** शहरात मागील काही दिवसांपासून चोरी, घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. या गुन्ह्यांमध्ये परराज्यातील टोळीचा हात असल्याचे शहर पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले आहे. त्यामुळे या टोळीच्या शोधासाठी गुन्हे शाखेचे पथक मागील दोन दिवसांपासून परराज्यात गेले असून, त्या ठिकाणी या टोळीचा शोध सुरू आहे. ही टोळी गुन्हे शाखेच्या हातात आल्यास शहरातील अलीकडे झालेल्या चोरी, घरफोडीच्या अनेक गुन्ह्यांचा उलगडा होणार आहे.कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीत चार दिवसांपूर्वी नमुना परिसरात एका माजी नगरसेविकाच्या घरातून चोरट्यांनी तब्बल २२२७ ग्रॅम सोन्यासह एक लाख रुपयांची रोकड लंपास केली आहे. त्यापूर्वी गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीतील श्री गजानन घाम येथील एकाचवेळी पाच घर फोडल्याचे समोर आले होते. याशिवाय अलीकडे शहरात घरफोडी, चोरीच्या घटना वारंवार घडत आहे. त्यामुळेच गुन्हे शाखा युनिट एकचे पथक या गुन्ह्यात सहभागी चोरट्यांचा शोध घेत होते. दरम्यान काही दिवसांपासून परराज्यातील एक टोळी शहरात गुन्हे करण्यासाठी आल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले होते. त्यामुळे नमुन्यातील मोठी घरफोडी तसेच श्री गजानन धाममधील घरफोड्या या टोळीने केल्याची दाट शक्यता पोलिसांना आहे.

# भूषण गवई यांनी घेतली महावितरणच्या योजनांची माहिती

## विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळाव्यात महावितरणच्या विविध योजनांचा जागर



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१० अमरावती–** धारणी येथे आयोजित विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळाव्यात विविध शासकीय विभागाप्रमाणे महावितरणने लावलेल्या माहिती स्टॉलला भारताचे मा. मुख्य न्यायमूर्ती भूषण गवई आणि सर्वोच्च न्यायालयाचे मा.न्यायमूर्ती अभय ओक यांनी भेट दिली आणि महावितरणच्या विविध योजनांची माहिती घेतली. तसेच यावेळी ग्राहकांना योजनांची पुर्णपणे माहिती मिळावी यासाठी तयार करण्यात आलेल्या पोस्टर्स, पॉम्प्लेट आणि पुस्तिका या प्रचार साहित्याची पाहिणी केली.

महावितरणकडून राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा लाभ वीज ग्राहक व शेतकऱ्यांना मिळावा यासाठी धारणी येथे विधी प्राधिकरणाव्दारे आयोजित विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळाव्यात मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी आणि अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांच्या मार्गदर्शनात माहिती स्टॉल लावून विविध योजनांची माहिती देण्यात आली.

वीज ग्राहकांचे विजबिल शून्य करणारी प्रधानमंत्री सुर्यघर मोफत वीज योजनेत ७८ हजार रूपयापर्यंत अनुदान देण्यात येत आहे. तसेच मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत योजनेत अनुसूचित जाती व जमाती करीता ९५% आणि इतरांना ९०% अनुदान आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मुळे शेतकऱ्यांना दिवसा विजेचे स्वप्न पूर्ण होणार असून कायम स्वरूपी वीज पुरवठा खंडित वीज ग्राहकांना व्याज व विलंब आकारात संपूर्ण माफीसह सहा हप्त्यात वीज बिल भरून थकबाकीमुक्तीची संधी आहे, अश्या विविध योजनांची या स्टॉलच्या माध्यमातून माहिती देण्यात आली.

यावेळी महावितरणच्या माहिती स्टॉलला विधी क्षेत्रातील इतर मान्यवरांसोबत हजारो शेतकरी व वीज ग्राहकांनी भेट देत माहिती घेतली. उपकार्यकारी अभियंता धारणी श्याम येनगंटिवार, सहायक अभियंता चक्रधर पटेल, सहाय्यक लेखापाल घावडे, तसेच शहर आणि ग्रामीण वितरण केंद्रातील कर्मचारी यांनी महावितरणच्या योजनांची माहिती दिली.

# ... तर चालकाला होणार एक हजाराचा दंड

## आरटीओ ईशारा : वाहनाला एचएसआरपी नंबर प्लेट गरजेचा

## चालकांनी एचएसआरपी नंबरप्लेटकडे फिरवली पाठ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८ अमरावती–** १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या वाहनांना 'उच्च सुरक्षा क्रमांक पाटी' (हाय सिक्युरिटी नंबर प्लेट, एचएसआरपी) बसवून घेणे बंधनकारक आहे. मात्र, अनेक वाहनचालक हाय सिक्युरिटी नंबरप्लेट लावण्याकडे दुर्लक्ष करत आहेत. मात्र ३१ मार्चपूर्वी 'एचएसआरपी' न लावल्यास एक हजार रुपयांचा दंड वाहनचालकांवर आकारण्यात येईल, असा इशारा प्रादेशिक परिवहन विभागने दिला आहे.

वाहनांची ओळख पटविणे, वाहन क्रमांकाच्या पाट्यांमध्ये होणारी छेडछाड थांबविण्यासाठी: तसेच वाहनांचा वापर करून होणारे गुन्हे रोखण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने वाहनांना 'उच्च सुरक्षा क्रमांक पाटी' बंधनकारक करून राज्यांना अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार ३१ मार्चपूर्वी हा नंबर न लावल्यास हजार रुपयांचा दंड ठोठावला जाणार आहे.

**सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश**

सन २०२९ पूर्वी खरेदी केलेल्या वाहनाला हाय सिक्युरिटी



नंबरप्लेट लावण्यास सुरुवात झाली आहे. मात्र अद्यापही राज्यात अत्यल्प चालकांनी हा नंबरप्लेट लावला आहे. त्यामुळ सर्वोच्च न्यायालयाने दंड आकारण्याचे निर्देश दिले आहेत.

**अशी करा नोंदणी**

अर्जदाराने transport. maharashtra gov.in या संकेतस्थळावर जावे. अर्जासह पुढे जाण्यासाठी तुमचे कार्यालय निवडा. वाहनाचे पहिले ४ अंक टाकावे. 'आरटीओ' कार्यालयीन कक्षेनुसार विक्रेत्याचे संकेतस्थळ निवडावे. वाहन घेताना नोंदणी केलेला मोबाइल क्रमांक, वाहनाचा मूलभूत तपशील भरावा. वाहन स्वास्थ्य केंद्राची सोयीनुसार वेळ आणि तारीख निश्चित करावी ऑनलाइन शुल्क भरावे. निवडलेल्या तारखेनुसार आणि वेळेनुसार सबंधित केंद्रावर उपस्थित राहावे.

# लसूण झाला स्वस्त, फोडणी द्या मस्त!

## २०० रुपये किलो : नव्या मालाची आवक सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती –** अन्नाला खमंग, स्वादिष्ट आणि रुचकर चव आणणाऱ्या लसणाची आवक वाढल्याने मागील महिन्यात चारशे रुपयांवर गेलेले दर आता निम्म्यावर आले आहेत. किरकोळ बाजारात गावरान लसणाची २०० रुपये किलो दराने विक्री सुरू आहे.

गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश आणि पंजाब या राज्यांत लसणाचे उत्पादन घेतले जाते. घटलेले उत्पादन,त्यात अवकाळी पावसाचा परिणाम, यामुळे लसणाचा तुटवडा जाणवत होता. पण आता लसूण स्वस्त झाल्याने फोडणी द्या मस्त, असे चित्र निर्माण झाले आहे.

...... दर आणखी घसरणार

लसणाचा नवीन हंगाम सुरू झाला असून, मध्य प्रदेशातील



लसणाची आवक वाढली आहे. थंडी ओसरल्यानंतर परराज्यातील लसणाचा हंगाम सुरू होतो. पुढील तीन ते चार महिने लसणाची मोठी आवक होणार आहे. दरात आणखी घट होणार असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

द र निम्म्यावरबाजारपेठेत सध्या गुजरात व मध्य प्रदेश येथून दररोज लसूण दाखल होत आहे. मागणीच्या तुलनेत ही आवक जास्त असल्याने मागील दहा दिवसांपासून लसणाच्या दरात घसरण सुरू झाली आहे. किरकोळ बाजारात किलोचे दर १५० ते २०० रुपयांवर पोहोचले आहेत.दोन दिवस सर्वाधिक आवकसोमवार व मंगळवार या दोन दिवशी सर्वाधिक लसणाची आवक होते. तर अन्य दिवशी किरकोळ आवक सुरू असल्याचे चित्र दिसत आहे.

# आमदार उमेश यावलकर यांनी साधला रुग्णांशी संवाद

## मोफत डोळे शस्त्रक्रिया यशस्वः वयोवृद्ध रुग्णांना दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०वरुड–** आशा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आमदार उमेश यावलकर यांनी सुरू केलेल्या मोफत रुग्णसेवा उपक्रमांतर्गत डोळ्यांच्या यशस्वी शस्त्रक्रियेनंतर परतलेल्या रुग्णांशी त्यांनी संवाद साधला. मतदारसंघातील अनेक गरीब व गरजू वयोवृद्ध रुग्णांना आर्थिक अडचणीमुळे योग्य वैद्यकीय उपचार घेणे कठीण होत आहे. ही समस्या लक्षात घेऊन आमदार उमेश यावलकर यांनी आरोग्यसेवा मोहीम राबवून गरजूंसाठी मदतीचा हात पुढे केला आहे.

याच सेवाभावी उपक्रमाअंतर्गत, दिनांक ०९ फेब्रुवारी २०२५ रोजी डोळ्यांच्या यशस्वी शस्त्रक्रियेनंतर घरी



परतलेल्या रुग्णांची त्यांनी आस्थेने विचारपूस केली. या शस्त्रक्रिया पूर्णतः मोफत करण्यात आल्या असून, रुग्णांना योग्य वैद्यकीय सुविधा मिळाव्यात यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. रुग्णांच्या समस्या जाणून घेत त्यांच्या आरोग्याबाबत विचारपूस करताना आमदार यावलकर यांनी आश्वासन दिले की, भविष्यातही गरजूंसाठी असे आरोग्य सेवा उपक्रम राबवले जातील.

रुग्णांनीही आमदार उमेश यावलकर यांचे मनःपूर्वक आभार मानले. अनेक वयोवृद्धांनी आपल्या भावना व्यक्त करत सांगितले की, आर्थिक अडचणींमुळे उपचार करणे शक्य नव्हते, पण आमदार साहेबांच्या मदतीमुळे आम्हाला पुन्हा जगण्यासाठी नवी आशा मिळाली आहे.

या प्रसंगी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, कार्यालयीन कर्मचारी तसेच ट्रस्टचे सदस्य उपस्थित होते. या सेवाकार्यास हातभार लावणाऱ्या सर्व टीमचेही आमदार उमेश यावलकर यांनी कौतुक केले. तसेच रुग्णांसाठी चहा-पाण्याची विशेष व्यवस्था करण्यात आली होती व त्यांना सुरक्षितपणे घरी पोहोचविण्यात आले. या उपक्रमामुळे मतदारसंघातील आरोग्यसेवा अधिक मजबूत होऊन गरजू रुग्णांना दिलासा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# सुटीच्या दोन दिवसांत ३८ लाख ९४ हजार मालमत्ता कराची वसुली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती–** महापालिकेने थकीत मालमत्ता करावरील दंडात १०० ठक्के सूट दिल्यानंतर शनिवार व रविवार या देन्ही सुटीच्या दिवशी पाचही झोनमध्ये कर वसुली शिबिराचे आयोजन केले होते. या दोन दिवसांत एकूण ३८ लाख ९४ हजार रुपये मालमत्ता कराची वसुली झाली आहे. शनिवारी २५ लाख ८३ हजार रुपये कर नागरिकांनी भरला. रविवारी दिवसभरात १३ लाख ११ हजार रुपये कर भरला. शनिवारच्या तुलनेत रविवारी कमी कर वसूल झाला. मोठ्या प्रमाणात नागरिकांनी शिबिरांमध्ये जाऊन कर भरला. तरीही काही असे नागरिक आहेत, ज्यांनी ऑनलाइन कराचा भरणा केल्यामुळे नेमक्या किती करदात्यांनी कराचा भरणा केला याबाबतची माहिती तत्काळ मिळाली नाही.

३१ मार्चपर्यंत दर आठवड्यात सुटीच्या दिवशी कर भरण्याची सोय करण्यात



आली आहे. यासाठी शहरात विविध ठिकाणी शिबिरांचे आयोजन केले आहे. महापालिकेला एकूण किमान ११० कोटी रुपये कर वसूल करायचा आहे. ३१ जानेवारीपर्यंत ६० कोटी रुपये कराची वसुली झाली होती. त्यानंतर ३१ मार्चपर्यंत एकूण १९० कोटी रुपये कर वसूल करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले होते. दरम्यान मनपा प्रशासनाने थकीत करावरील दंड २८ फेब्रुवारीपर्यंत १०० टक्के माफ केला आहे. त्यामुळे मनपाला एकूण १५० कोटी रुपये कर वसूल करायचा आहे. परंतु, फारतर ११० ते १२० कोटीपर्यंत कर वसूल होऊ शकतो, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.–

# मेळघाट च्या आमदारांचा आदिवासी विद्यार्थ्यांशी शाळेत मुक्काम करून संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८धारणी**

संवाद चिमुकल्यांशी' अभियानांतर्गत आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ. अशोक उईके यांच्या आदेशाने चिखलदरा तालुक्यातील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा,डोमा येथे मुक्काम केला. येथील विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासोबतच त्यांनी आश्रमशाळेतील सोई-सुविधांची पाहणी केली. यावेळी राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके साहेब यांच्याशी ऑनलाईन संवाद साधत विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन केले राज्यातील सर्व आश्रमशाळा शैक्षणिक गुणवत्तेने परिपूर्ण करु, असे ते यावेळी बोलतांना म्हणाले.



विद्यार्थ्यांला आश्रमशाळेत टाकतांना येथे उत्तम दर्जाचे शिक्षण व सुविधा उपलब्ध होते, अशी भावना पालकांच्या मनात निर्माण झाली पाहिजे. त्यासाठी आश्रमशाळांचे अधिक्षक, शिक्षक यांनी विशेष प्रयत्न व अध्यापन करणे गरजेचे आहे.

# अल्पवयीन मुले ऑनलाइन गेमच्या विळख्यात

## पालकांनो, सावधान आपल्या बालकांकडे वेळीच लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती –** सोशल मीडियाने जगाला वेड लावले असून, लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच तासन् तास मोबाइलवर चॅटिंगचे व्यसन जडले आहे. त्यामुळे ऑनलाइन गेम खेळणे लोकांना विशेषतः लहान मुलांना जबरदस्त आणि थ्रिलिंग वाटत असून, अल्पवयीन मुले ऑनलाइन गेमच्या विळख्यात अडकल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. त्यामुळे लहान मुले आणि तरुण पिढीवर मानसिक ताण येत आहे.अनेकांना मोबाइलवर ऑनलाइन गेम खेळण्याचे व्यसन



जडले आहे. ऑनलाइन गेमच्या व्यसनामुळे तरुण, किशोरवयीन मुले प्रथम कर्जबाजारी व नंतर मनोरुग्ण बनल्याचे त्यांच्या समुपदेशनातून समोर आले आहे.सध्या शाळकरी मुलांना मोबाइलवर ऑनलाइन गेम खेळण्याचे व्यसन जडले असून, ऑनलाइन गेममध्ये दिलेला टास्क पूर्ण करण्यासाठी मुले कोणत्याही स्तराला जातात; आणि टास्क पूर्ण न झाल्यास मुलांमध्ये चिडचिडेपणा वाढतो.

मोबाइल गेमच्या व्यसनाचा प्रभाव आणि प्रतिबंधमोबाइल गेमच्या व्यसनामुळे मुले हिंसक बनत आहेत. त्याचा त्यांच्या आरोग्यावर आणि शैक्षणिक अभ्यासावर परिणाम होत आहे. त्याचबरोबर एकलकोंडे आणि मानसिक नैराश्यात मुलांचे करिअर अडकले आहे. दिवसभर मोबाईल होती घेऊन मुले घरातच राहतात. परिणामी त्यांची शारीरिक हालचाल मंदावली आहे. यामुळे आरोग्याच्या समस्या उद्भवतात

## स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे राज्यस्तरीय वायय पुरस्कारासाठी प्रवेशिका आमंत्रित

विदर्भ प्रजासत्ताकदि.१० अमरावती–येथील स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे चॅरिटेबल ट्रस्टतर्फे दरवर्षी दिल्या जाणाऱ्या स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे राज्यस्तरीय मराठी वायय पुरस्कारांसाठी प्रवेशिका मागविण्यात येत आहेत.'साहित्यव्रती' पुरस्काराचे स्वरूप ११ हजार रुपये रोख, शाल-श्रीफळ, मानपत्र असे आहे तर उत्कृष्ट कादंबरी, कथासंग्रह, कवितासंग्रह, वैचारिक व समीक्षा लेखन, बालसाहित्य, संमिश्र वाङ्.मय या सहा पुरस्काराचे स्वरूप प्रत्येकी तीन हजार रुपये रोख, शॉल-श्रीफळ, गौरवचिन्ह, सन्मानपत्र, असे आहे. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत प्रकाशीत कलाकृती या पुरस्कारासाठी ग्राह्य धरण्यात येतील. संबंधितांनी पुस्तकाच्या दोनप्रती, अल्प परिचय २० फेब्रुवारीपर्यंत समिती सदस्य आर. एस. तायडे, १२, 'दिक्षा', कोणार्क कॉलनी, रंगोली लॉन मागे, कठोरा रोड, अमरावती, ४४४६०४ या पत्यावर पुरेशा पोस्टेजसह पाठवावे. अमरावती जिल्ह्यातील लेखकांनी पण सदर प्रवेशिका 'साहित्यव्रती' पुरस्काराकरिता पाठवाव्यात, हा सन्मान विदर्भातील लेखकालाच दिला जातो.यासाठी प्रस्ताव मागवले जात नाहीत. अधिक माहितीसाठी ९४२०१२५७६१ (आर.एस. तायडे) या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा. असे आवाहन संयोजक प्राचार्य डॉ. शोभा रोकडे, यांनी केले

# पूर्णा नदीत बुडालेल्या जवानावर अंत्यसंस्कार

**विदर्भ प्रजासत्ताक, दि.१०येवदा–** सासन येथे सुटीवर आलेला सैनिक गोपाल रामदास बातखडे (३०) यांचा रामतीर्थ जवळील पूर्णा नदीपात्रात बुडाल्याने मृत्यू झाला. त्यांच्यावर रविवारी (दि. ९) शासकीय इतमामात सासन येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.दर्यापूर तालुक्यातील सासन येथील रहिवाशी गोपाल वानखडे हे शनिवारी (दि. ८) दुपारी ४ च्या सुमारास त्यांचे मित्र विकास नागोराव सोनीने व विकी गौतम सोनोने यांच्यासोबत काही कामानिमित्त मौसांग येथे गेले होते. परत येताना रामतीर्थ येथील पूर्णा नदीपात्रात गोपाल वानखडे व विकास सोनोने हे दोघे उतरले. मात्र, त्यांना पाण्याचा अंदाज न आल्याने अचानक दोघेही बुडू लागले. स्थानिकांच्या मदतीने विकासला वाचवले. परंतु, गोपालला बाहेर निघता आले नाही. रविवारी सकाळी बचाव पथकाला त्यांचा मृतदेह शोधण्यात यशआले. गोपाल वानखडे हे पालमपूर, हिमाचल प्रदेश येथे भारतीय सैन्यात सिग्नल विभागात कार्यरत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन वर्षांची मुलगी आईवडील, लहान भाऊ असा आप्त परिवार आहे.

# ई-केवायसी न केल्यास रेशन कार्डमधून होणार नाव कमी...!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१० अमरावती–** अन्नधान्य वितरणाची प्रक्रिया पारदर्शक व्हावी व लाभार्थ्यांनाच रेशन धान्याचा लाभ मिळावा, यासाठी रेशनकार्डमधील प्रत्येक लाभार्थ्यांची ई-केवायसी करणे महत्त्वाचे आहे व यासाठी पुरवठा विभागाने २८ फेब्रुवारीपर्यंत चौथ्यांदा मुदतवाढ दिलेली आहे. या अवधीत ई-केवायसी न केल्यास संबंधित रेशनकार्डधारकांचे नाव शिधापत्रिकेतून कमी करण्यात येऊन त्यांचा रेशन पुरवठा बंद होणार आहे.

जिल्ह्यातील ३,७४,३३५ रेशनकार्डधारकांना सरकारी स्वस्त धान्याचा पुरवठा सध्या होत आहे. यामध्ये बोगस कार्डधारकांना रेशन धान्य पुरवठा होऊ नये, यासाठी पुरवठा विभागाद्वारा विभाग उपाय योजले जातात. यामध्ये आता संबंधित रेशन दुकानदाराकडील पॉस मशीनद्वारे ई-केवायसी करावी लागत आहे. यासाठी दोन वर्षापासून पुरवठा विभागाद्वारा लाभार्थ्यांकडे सातत्याने पाठपुरावा केल्या जात आहे. यासाठी २८ फेब्रुवारी ही अंतिम तारीख दिलेली असताना अद्याप ३२.६५ टक्के लाभार्थ्यांनी ही प्रक्रिया केलेली नाही. मध्यंतरी फक्त १५ दिवस पॉस मशीन बंद होत्या. त्यानंतर नियमितपणे प्रक्रिया सुरू आहे. मात्र रेशन लाभार्थ्यांद्वारा ही प्रक्रिया करण्यास टाळाटाळ केली जात आहे.

**का केली जाते ई-केवायसी?** शिधापत्रिक आधार क्रमांकासह संलग्न केल्यानंतर संबंधित कार्डधारकांचा अधार क्रमांक अचूक आणि तोच आहे, याची पडताळणी (सत्यापन) या प्रक्रियेद्वारे केली जाते. ओळख व पत्ता यासाठीदेखील ई-केवायसीची प्रक्रिया महत्त्वाची आहे.



**शिधापत्रिकेतील सर्व व्यक्तींचे सत्यापण** शिधापत्रिकेत नमूद सर्वच व्यक्तींचे आधार कार्ड घेऊन सत्यापण करणे सक्तीचे करण्यात आलेले आहे. ज्या व्यक्तीचे सत्यापण होणार नाही, त्याचे नाव शिधापत्रिकेमधून वगळले गेल्यास व परिणामी त्यांचे शिधाजिन्नस बंद झाल्यास सर्वस्वी जबाबदारी राहील. ३३ टक्के शिधापत्रिकाधारकांनी फिरविली पाठ रेशन दुकानात ई-केवायसी करण्यासाठी फक्त अधार कार्ड व शिधापत्रिका याच दोन गोष्टी आवश्यक आहेत. तरीही लाभार्थ्यांद्वारा टाळाटाळ करण्यात येत आहे.

**महिन्याचे धान्यदेखील मिळणार नाही–** प्रधान्य गट लाभार्थी – १५,१२,१३० ई-केवायसी बाकी – ६,७५,३७७

अंत्योदय लाभार्थी – ४,७८,५४८

प्राधान्य गट कार्ड – ३,७४,३३५

अंत्योदय – १,२८,२०७

**ई-केवायसी बाकी तालुकानिहाय लाभार्थी**

अचलपूर ७६,४५६, तहसील ४०,१५३, मोर्शी ३६,३६३, अंजनगाव ३५,७०२, भातकुली २८,७९७, चांदूररेल्वे १७,२२४, चांदूरबाजार ६१,३३० , चिखलदरा ३४,९३८ , दर्यापूर ३१,६६४, धामणगाव रेल्वे २८,७३६, धारणी ५९,३९९, नांदगाव खंडेश्वर १८,३३३, तिवसा २८,१५२, वरुड ४२,६४२ व अमरावती एफडीओ मध्ये १,३५६,४८३ लाभार्थ्यांनी ही प्रक्रिया केलेली नाही.

# अन्न व औषधी विभागाच्या नमुन्यांचे अहवाल प्रलंबित

## अमरावती विभागात प्रयोगशाळा नसल्याने विलंब : रिक्त पदांमुळे तपासणी मोहिमेवर परिणाम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

अन्न व औषधी विभागात अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मोठ्या प्रमाणात तुडवडा असल्याने खाद्य पदार्थ व औषधी तपासणी मोहिमेवर त्याचा विपरित परिणाम होत आहे. त्यातच जप्त केलेल्या पदार्थांचे नमुने परीक्षणासाठी प्रयोगशाळेत पाठविले असता, त्यांचे अहवालसुद्धा महिनोन्महिने प्रलंबित असल्याचे गंभीर वास्तव आहे.राज्यात नागपूर, मुंबई, औरंगाबाद आदी मोजक्याच ठिकाणी खाद्य पदार्थांचे परीक्षणकरणाऱ्या प्रयोगशाळा आहेत. अमरावती विभागात कोठेही प्रयोगशाळा नसल्याने येथील नमुने नागपूरच्या प्रयोगशाळेत पाठवावे लागतात. गत एप्रिल २०२४ पासून जानेवारी २०२५ पर्यंत ९० पेक्षा अधिक खाद्यपर्थांचे नमुने परीक्षणासाठी पाठविण्यात आले. त्यापैकी केवळ १५ ते २० नमुन्यांचेच अहवाल स्थानिक




प्रशासनाला प्राप्त झाले आहे. याशिवाय औषधी तपासणी विभाकडूनही आतापर्यंत पाठविलेल्या ३४ पैकी १० पेक्षा अधिक नमुन्यांचे अहवाल अद्याप प्राप्त झाले नसल्याची माहिती आहे. दरम्यान, अमरावती विभागातील ५ पैकी ३ अन्न सुरक्षा अधिकारी पदे रिक्त आहेत. अमरावतीचे साहाय्यक आयुक्त पदही रिक्त आहे. एकीकडे अन्नसुरक्षाअधिकारी नाही आणि दुसरीकडे गुटख्यासारख्या अवैध पदार्थांची सर्रास विक्री सुरू आहे. त्यामु ळे कार्यरत अधिकारी ना अवैध गुटख्यांची नियमित तपासणी करू शकत, ना खाद्य पदार्थांची भेसळ तपासण्यासाठी पुरेसा वेळ देऊ शकत. त्यामुळे बाजारात् गुटखा विक्रेते व खाद्य पदार्थात भेसळ करणारेही बिनधास्त झाले आहे. याचाच परिणाम म्हणून गत सप्टेंबर व ऑक्टोबर २०२४ मधील ७ ठिकाणच्या खाद्यपर्थांचे नमुने अप्रमाणित असल्याचे अहवाल स्थानिक प्रशासनाला प्राप्त झाले आहेत. दरम्यान, नुकताच शासनाने या विभागात पदभरतीची प्रक्रिया राबविली असली, तरी त्यापैकी नेमके किती अधिकारी आणि कधी नियुक्त होतात, यासाठी प्रतीक्षाच करावी लागणार आहे.

**मसाला टोस्टमध्ये आढळल्या अळ्या!अन्न पुरवठा अधिकाऱ्याकडे तक्रार**

मोर्शी शहरात ओरिजनल गुड डे मसाला टोस्ट पाकीटमध्ये चक्क मेलेल्या अळ्या व काळ्या प्लॅस्टिकचे तुकडे आढळून आल्यामुळे ग्राहकामध्ये तीव्र नाराजीचा सूर उमटला आहे. याबाबत कंपनीविरुद्ध कार्यवाही करण्यात यावी, अशा आशयाचे एक लेखी निवेदन अन्नपुरवठा अधिकारी मोर्शी यांना देण्यात आले.समर्थ कॉलनी मोर्शी येथील नीरज वासुदेवराव भिसे यांच्या घरी ओरिजनल गुड डे मसालाटोस्ट ब्रेडचा पुडा विकत घेतला व तो ब्रेडचा पुडा फोडून लहान मुलांना खाण्यासाठी देत असताना प्लेटनेध्ये टाकला असता त्या ब्रेड टोस्टवर चक्क मेलेल्या अळ्या व काळ्या प्लॅस्टिकचे तुकडे आढळून आले. त्यावरून त्यांच्या घरी एकचतारांबळ उडाली. तरी या गुड डे कंपनीवर त्वरित कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी नीरज भिसे यांनी केली आहे.

# २५० ग्राहकांचा पाणीपुरवठा होणार खंडित

## जिल्हा रुग्णालय, कारागृहासारख्या शासकीय कार्यालयांनाही नोटीस : मजीप्राच्या १,५०० ग्राहकांना कारवाईचा 'अल्टिमेटम'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

चालू आर्थिक वर्ष संपण्याच्या मार्गावर असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने पाणीपट्टी देयक वसुलीसाठी मोहीम सुरू केली आहे. महापालिका क्षेत्रातील ग्राहकांकडे तब्बल ४५० कोटी रुपयांचे देयक थकीत असल्याने पाणीपुरवठा योजना कशी चालवायची, असा प्रश्न प्रशासनासमोर उभा ठाकला आहे. त्यामुळे गत दीड ते दोन महिन्यांत सुमारे दीड हजार नळजोडणीधारकांना नोटीस देण्यात आल्या असून, त्यापैकी



२५० पेक्षा अधिक नळजोडणीचारकांचा पाणीपुरवठा खंडित करण्यात आला आहे.महापालिका क्षेत्रात एकूण १ लाख २ हजार ४१६ नळजोडणीधारक आहे. सिंभोरा धरणापासून ५५ किमी अंतरावरील अमरावती शहरापर्यंत पाइपलाइनद्वारे पाणी आणणे, त्यानंतर जलशुद्धीकरण करून २५ पाणीटाक्यांद्वारे प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे पाणी पोहोचविणे आदी प्रक्रियेसाठी वार्षिक ३६ कोटी रुपयांचा खर्च येतो. त्या तुलनेत आतापर्यंत सुमारे २४ कोटी रुपयेच वसूल झाले आहे. याचाच अर्थ १२ कोटी रुपयांनी ही योजना तोट्यात आहे. याशिवाय ग्राहकांकडील जुन्या थकबाकीचा आकडा वेगळाच आहे. त्यातच आर्थिक वर्ष २०२४-२५ संपायला जेमतेम दीड महिना शिल्लक आहे. एवढ्या कमी कालावधीत पाणीपट्टी देयक वसूल करण्याचे आव्हान प्रशासनासमोर आहे. त्यामुळे वारंवार आवाहन करूनही प्रतिसाद न देणाऱ्या थकबाकीदार ग्राहकांच्या नळजोडण्या खंडीत करणे, ९० टक्के थकबाकीदार ग्राहक असलेल्या भागातील संपूर्ण पाणीपुरवठा बंद करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच अवैध नळजोडणीधारकांनी पंडासह नळजोडणी वैध करून न घेतल्यास त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याचाही निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे आतापर्यंत सुमारे २५० थकबाकीदार ग्राहकांवर कारवाई करण्यात आली आहे, अशी माहिती मजीप्राचे उपअभियंता संजय लेवरकर यांनी दिली.

# बोगस सातबाऱ्यावर शासकीय कापूस खरेदीचा धुमाकूळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अंजनगाव सुर्जी**

शेतकऱ्यांच्या मागणीवरुन अंजनगावसुर्जी येथे कापसाची शासकीय खरेदी सुरू करण्यात आली. केंद्रावर आजपर्यंत दोन लाख तीस हजार क्विंटल कापूस खरेदी झाली. बनावट सातबाऱ्यावर काही संचालक, व्यापारी, जिनींग प्रेसींग व्यावसायिकांनी शासकीय कापूस खरेदीचा धुमाकूळ चालविला आहे.

आजपर्यंतच्या शासकीय खरेदीत काही सहकाराचे संचालक, व्यापारी, जिनीग प्रेसीग व्यावसायिकांनी हजारो क्विंटल कापूस खरेदी बोगस व डुप्लीकेट सातबाऱ्यावर केलेली असताना सीसीआयच्या उशिरा सुचलेल्या शहानपणामुळे महिला, दिव्यांग, सत्तर-पंचाहत्तरी पार केलेल्या सातबारा धारकांना हजर राहत कापूस तोलून घ्यावा लागत आहे.शासनाचे कापूस खरेदी योजनेत आजपर्यतच्या खरेदीत या व्यावसायिकांनी शेतकऱ्यांकडून कमी भावात शेतमाल खरेदी करुन तोच शेतमाल जवळच्या नातेवाईक, संबंधित गरजू शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावर विकून शासकीय खरेदीला (सीसीआय) चुना लावल्या जात असल्याची पात्र शेतकऱ्यांची ओरड तालुक्यात सुरू आहे.

# बडनेऱ्यात विना परवाना खाद्यपदार्थ सर्रास विक्री! नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०बडनेरा**

बडनेरा कुठलाही व्यवसाय करायचा असेल तर त्याकरिता एफडीए नोंदणी करणे अनिवार्य आहे. व्यवसाय करताना कुठल्या नियमाचे पालन केले पाहिजे, यासंदर्भात काही नियम अटी ठरवून दिलेले आहेः मात्र सर्व नियम धाब्यावर बसवून शहरात विनापरवाना खाद्यपदार्थ विक्री करणारे व्यवसाय फोफावले आहेत. कुठल्याही चौकात अतिक्रमण करून ठिकठिकाणी उघड्धावर खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या हातगाड्या लागल्या दिसून येत आहे.शहरात या व्यवसायातून दररोज लाखो रुपयाची उलाढाल होत आहे. तथापि जन आरोग्याकडे मात्र दुर्लक्ष केले जात आहे. लाखो रुपयाच्या या व्यवसायासाठी सर्व नियमांनाव्यवसायाकडून तिलांजली दिली जात असल्याचे वास्तव आहे. दूषित पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो, तसेच अनेक ठिकाणी तर स्वच्छता केली जात नाही. ज्या ठिकाणी अन्नपदार्थ तयार केले जातात, तेथे घाणीचे साम्राज्य दिसून येते.यामुळे रस्त्यावर खाद्यपदार्थ तयार करून




त्या खाद्यपदार्थ रस्त्यावरची धूळ तसेच माशा बसलेल्या दिसून येतात. त्यामुळे आरोग्यास घातक ठरू शकते, याकडे अन्न प्रशासन विभाग कोणत्याच प्रकारची कारवाई करताना वर्षभरात दिसून आले नाही.व्यवसाय करताना नोंदणी तसेच परवाना आवश्यक असताना या नियमाची कुठे पालन किंवा परवाना आवश्यक आहे. त्यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे तरी याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे. तसेच उघड्यावर खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली जात आहे.

# जिल्ह्यात १० वी, १२ वीच्या ७४,२५२ विद्यार्थ्यांसाठी केवळ १ समुपदेशक

## एक समुपदेशक कुठे कुठे पुरणार, पालक, विद्यार्थ्यांचा प्रश्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाव्दारे मंगळवार, ११ फेब्रुवारीला बारावी व २१ तारखेडा दहावीच्या परीक्षेला सुरूवात होत आहे. या काळात अनेक विद्यार्थी नकारात्मक विचार, कठीण विषयांची भीती, तणाव व नैराश्याने ग्रासलेले असतात. त्यातून त्यांना बाहेर काढण्यासाठी समुपदेशकाची नियुक्ती केली जातेः मात्र अमरावती जिल्ह्यात दहावी व बारावीचे एकूण ७४ हजार २५२ विद्यार्थी परीक्षा देणार असले, तरी केवळ एकाच समुपदेशकांकडे या




एवढ्या मोठ्या संख्येतील विद्यार्थ्यांची जबाबदारी सोपवण्यात आली.

त्यामुळे उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळते की काय, अशा परखड प्रतिक्रिया पालकांसह विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या आहेत. बोर्ड केवळ कागदी घोडे नाचवत शासनाच्या आदेशाचे पालन करण्याचा देखावा तर करत नाही, असा प्रश्नही त्यांना पडला आहे.राज्य शिक्षण मंडळाव्दारे घेण्यात येणारी बारावीची परीक्षा १९ फेब्रुवारी ते १८ मार्च, तर दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत होत आहे.जिल्ह्यातून बारावीचे एकूण ३६ हजार ३१ विद्यार्थी १३९ केंद्रावरून, तर दहावीचे ३८ हजार २२१ विद्यार्थी १९६ केंद्रावरुन परीक्षा देणार आहेत. दरम्यान, विद्यार्थ्यांना परीक्षेसंदर्भात येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी विभागीय मंडळाव्दारे एका समुपदेशकाची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी मागील महिनाभरात दहावीच्या १६०, तर बारावीच्या जवळपास ७५ अशा सुमारे २३६ विद्यार्थ्यांचे समपदेशन केले आहे.


**समुपदेशकाची संख्या वाढवल्यास सोईचे होईल**

दहावी व बारावीची परीक्षा देणाऱ्या आमच्या मुलांना परीक्षेची भीती वाढत असल्याने ते दडपणाखाली आहेत. त्याचा परिणाम त्यांच्या अभ्यासावर होत आहे. बोर्डाव्दारे समुपदेशक नियुक्त करण्यात आल्याची माहिती मिळाली. त्यांच्यासोबत संपर्क साधला असता, त्यांनी मुलांचे समुपदेशन केले; परंतु त्यांच्यापर्यंत पोहोचण्यास बराच वेळ गेला. एकापेक्षा जास्त समुपदेशक नियुक्त केले, तर विद्यार्थ्यांसह पालकांना त्यांच्यापर्यंत पोहोचणे सोईचे होईल, अशा प्रतिक्रिया काही पालकांनी व्यक्त केल्यात.

# श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र रहाटगाव येथे होणार श्री गुरुप्रतीपदा साजरी : १३ फेब्रुवारी गुरुवार ला विविध कार्यक्रमाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

गुरु विना मार्ग नाही मानवी जीवनाचा.....माघ कृष्ण प्रतिपदा या तिथीला श्रीगुरुप्रतिपदा असे संबोधले जाते. त्याचे कारणही तसेच आहे. द्वितीय श्रीदत्तावतार भगवान श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराजांनी याच पावन तिथीला शैल्यगमन केले होते. गुरुप्रतिपदा या दिवशी श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराज कर्दळी वनात गुप्त झाले, निजगमनास जातांना स्वतःच्या निर्गुण पादुका स्वामींनी श्री क्षेत्र गाणगापूर येथे सेवेकरिता ठेवल्या अशी मान्यता आहे. गुरु प्रतिपदा दिनाचे औचित्य साधून श्री स्वामी समर्थ केंद्र रहाटगाव येथे मोठ्या थाटात भजन पूजन भाविकांच्या उपस्थितीत होणार आहे.भगवान श्रीगुरु नृसिंहसरस्वती स्वामी महाराजांचेच साक्षात् स्वरूप असणाऱ्या या तिन्ही पादुकांना विशेष नावे आहेत. देव वाडी सोडून निघाल्यामुळे दुःखी झालेल्या चौसष्ट योगिनींची समजूत घालताना स्वामी महाराज म्हणतात की, जे कोणी भक्त तुम्हां योगिनींसहित आमच्या मनोहर पादुकांची मनोभावे पूजा, सेवा करतील त्यांना इच्छित गोष्ट



नक्कीच मिळेल. भगवान श्रीनृसिंह सरस्वती महाराज शैल्यगमनापूर्वी आपल्या भक्तांना अभयवचन देताना म्हणतात,कल्पवृक्षातें पूजोन । यावें आमुचें जेथ स्थान । पादुका ठेवितो निर्गुण । पूजा करावी मनोभावें ।। श्रीगुरुचरित्र ५१.५२ ।।भगवान श्रीनृसिंह सरस्वती स्वामी श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथे बारा वर्षे राहिले. तेथून त्यांनी अश्विन कृष्ण द्वादशी, श्रीगुरुद्वादशीच्या मुहूर्तावर आपल्या 'मनोहर पादुका' स्थापन करून गाणगापुरकडे प्रयाण केले. गाणगापूर येथे चोवीस वर्षे वास्तव्य करून आजच्या पावन तिथीला आपल्या 'निर्गुण पादुका' स्थापन करून ते लौकिक अर्थाने श्रीशैल्य मल्लिकार्जुन क्षेत्री जाऊन अदृश्य झाले. त्यांनी आपला देह ठेवलेला नाही, ते फक्त अदृश्य झालेले आहेत, हा एक दुर्मिळ योगच म्हणावा लागेल. भक्ती भाव आणि अध्यात्माचा वारसा जोपासून गुरु प्रतिपदा दिनाची महती जाणून घेत विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र रहाटगाव येथे करण्यात आले आहे. तरी भाविकांनी जास्तीत जास्त संख्येने कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केंद्राच्या विश्वस्त मंडळींनी केले आहे.

# विद्यापीठातील संस्कृत विभागामध्ये वेदोत्सव कार्यक्रम संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

भारतीय संस्कृती ही ज्ञानप्रीय तसेच उत्सवप्रीय संस्कृती आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी भारतीयांनी पूर्वी अनंत काळापासून सदैव शास्त्राध्ययनाची परंपरा जोपासली आहे. वेद, उपनिषद, पुराणवायय तसेच महाकाव्य, कथा, नाटके यांसारख्या साहित्यग्रंथांचा व्यासंग जोपासलेला आहे. याच अनुषंगाने वसंत पंचमीचे औचित्य साधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदव्युत्तर संस्कृत विभाग व संस्कृत भारती, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने संस्कृत विभागामध्ये वेदोत्सव कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू महेंद्र ढोरे, प्रमुख अतिथी म्हणून नागपूर येथील वसंतराव नाईक ज्ञान व समाजविज्ञान संस्थेमधील सहायक आचार्य डॉ. पल्लवी कर्वे, संस्कृत भारतीचे विदर्भ प्रांताधिकारी श्री देवदत्त



कुलकर्णी, जनपद कार्याधिकारी प्रा. उल्हास बपोरीकर, संस्कृत विभागाच्या समन्वयक डॉ. संयोगिता देशमुख यांची उपस्थिती होती.

प्रमुख अतिथी आचार्य डॉ. पल्लवी कर्वे यांनी आपल्या मार्गदर्शनातून ज्ञानपरंरेचे अनेक पैलू उलगडून दाखविले. संशोधन विषयक उपलब्धता आणि आवश्यकता समजावून सांगतांना माता सरस्वती ही संशोधन प्रस्तुतीची देवी असल्याचे त्या म्हणाल्या.

अध्यक्षीय भाषणात डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, वेद हे आपल्याला अहितापासून दूर करुन आपल्या हिताचा मार्ग दाखवते असे सांगून त्यांनी वेदोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. विभाग समन्वयक डॉ. संयोगिता देशमुख यांनी वेदोत्सव कार्यक्रमाच्या निमित्ताने आपला संस्कृत विभाग देखील भारतीय ज्ञान परंपरेमध्ये भूमिका निभावत असल्याचे सांगितले. यावेळी विद्यावारिधि डॉ. राहुल लोधा यांचे छंदप्रवेशिका तसेच संस्कृत शिक्षिका अनुराधा शर्मा यांचे भगवद्गीता परिचय या पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. संस्कृत विभागामार्फत घेण्यात आलेल्या संस्कृत भाषा व बोधन वर्गातील उत्तीर्ण विद्याथ्र्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. सरस्वती शिशू वाटिका किरणनगर, अमरावती येथील बाल केंद्रातील विद्यार्थी मीरा भेरडे, भार्गव लोधा, राम जोशी, वेदांत क्षीरसागर, अथिरा मोरोणे, कृष्ण पांडे, सात्विक जोशी यांनी सरस्वती वंदना प्रस्तुत केली. विद्यार्थी अथर्व जोशी याने वैदिक स्तवन तसेच वैदिक स्वस्तीवाचन केले. विद्यार्थिनी अमृता कोरडे हिने संस्कृत स्वागतगीत सादर केले. प्रास्ताविक प्रा. स्वप्ना यावले, पाहुण्यांचा परिचय प्रा. प्रियंका मोहोड यांनी, सूत्रसंचालन डॉ. राहुल लोधा यांनी तर आभार प्रा. श्वेता बडगुजर यांनी मानले.शांतिमंत्राने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

विदर्भ प्रजासत्ताक

# चिंता नको...... सिंचन प्रकल्पांत ६ 3 टक्के जलसाठा

## प्रकल्पांच्या क्षेत्रात मुबलक पाणीसाठा: सिंचनालाही कमी मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

उन्हाळा सुरू झाला असताना व पाणीटंचाईच्या झळा जिल्ह्यातील ग्रामीण भागांत पोहोचण्याची शक्यता असताना जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांत ६३ टक्के जलसाठा ही समाधानकारक बाब मानली जात आहे. गत हंगामात झालेल्या पावसाची सरासरी यासाठी कारणीभूत असून सिंचनासाठी पाण्याची कमी मागणी झाल्याने प्रकल्पांमध्ये जलसाठा पर्याप्त प्रमाणात उपलब्ध आहे.




जिल्ह्यात अप्परवर्धा या मोठ्या प्रकल्पासह सात मध्यम व ४८ लघुप्रकल्प आहेत. विद्यमान स्थितीत ५६ सिंचन प्रकल्पांत ६६६ दलघमी (६३ टक्के) जलसाठा उपलब्ध आहे. अप्परवर्धा प्रकल्पात ३८३ दलघमी साठा 'असल्याने अमरावती शहरासह या प्रकल्पावर अवलंबिलेल्या पाणीपुरवठा योजनांसाठी मुबलक पाणीपुरवठा करता येणार आहे, तर सात मध्यम प्रकल्पांत प्रकल्पीय सिंचन क्षमतेच्या तुलनेत १५० दलघमी साठा आहे. लघुप्रकल्पांपैकी काही प्रकल्प उन्हाळ्यात तळ गाठतात. सद्यस्थितीत या ४८ प्रकल्पांत १३३ दलघमी जलसाठा उपलब्ध आहे.

पाणीटंचाईच्या झळा प्रामुख्याने लघुप्रकल्पांच्या क्षेत्रात जाणवण्याची शक्यता आहे. गत हंगामात पावसाने चांगली हजेरी लावत सरासरी गाठल्याने सिंचन प्रकल्पांत शंभर टक्के जलसाठा होऊ शकला. पाऊस सार्वत्रिक झाल्याने भूगर्भातील पाणीपातळीतही वाढ झाल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे.याचा परिणाम शेतीसाठी लागणाऱ्या सिंचनासाठीच्या पाण्यावर झाला. यंदा भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ झाल्याने सिंचनासाठी पाण्याची तुलनेने मागणी कमी झाली आहे. प्रकल्पातील पाण्याचा उठाव कमी' झाल्याने पाणीपातळी कमी झाली नाही.

# ..आणि न्यायमूर्तींचे हेलिकॉप्टर भरकटले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०धारणी**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष तथा सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी धारणी येथे विधी सेवा महाशिबिराला उपस्थित राहण्यासाठी नागपूर येथून हेलिकॉप्टरने रविवारी उड्डाण केले. मेळघाटात प्रवेश करताच नेटवर्क कनेक्टिव्हिटी खंडित झाल्याने पायलटसह धारणीतील आयोजकांची पाच ते सात मिनिटे भंबेरी उडाली. हेलिकॉप्टर लैंड झाल्यानंतर सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

रविवारी सकाळी ११ च्या सुमारास नागपूरहून निघालेल्या हेलिकॉप्टरमध्ये न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यासह मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, न्या. अतुल चांदूरकर, न्या. रेवती डेरे, न्या. वासुदेव सांबरे यामध्ये होते. मेळघाट जंगल परिसरात आल्यानंतर अचानक हेलिकॉप्टरची नेटवर्क कनेक्टिव्हिटी गेली. त्यामुळे पाच ते सात मिनिटे हेलिकॉप्टर भरकटले आणि सर्वांना घाम फुटला. काही काळ हवेत घिरट्या घातल्यानंतर चॉपरला नियोजित मार्ग मिळाल्यानंतर ते धारणी मार्गावर आले आणि सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला,अशी माहिती स्वतः न्यायमूर्ती भूषण गवई यांनी दिली. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांनी त्यांच्यापूर्वीच कारने धारणी गाठले होते.




**पोलिसांचे केले कौतुक**

कार्यक्रम झाल्यानंतर न्यायमूर्ती भूषण गवई यांनी सभास्थळी लावण्यात आलेल्या ४० स्टॉलना भेट दिली. यावेळी पोलिस ठाण्याच्या स्टॉलसमोर आले असता, ठाणेदार अशोक जाधव आणि पोलिस उपनिरीक्षक सतीश झाल्टे यांच्यासमक्ष आल्यानंतर त्यांनी लावण्यात आलेल्या सूचना फलकाचे अवलोकन केले आणि माहिती घेतली.

धारणी पोलिसांनी मिसिंग झालेले ३५ मोबाइल सोहळ्यादरम्यान परत केल्याची माहिती दिली. त्याचप्रमाणे सायबर क्राइम, क्राइम अगेन्स्ट वूमन, बालविवाह, रस्ता सुरक्षा सप्ताह आणि डायल ११२ याबाबत लावण्यात आलेल्या फलकाचे कौतुक न्यायमूर्तींनी केले.

# राणा दांपत्य १२ ते १४ फेब्रुवारी प्रयागराज मध्ये मुक्कामी

## महाकुंभ मेळामधील त्रिवेणी संगम येथे पवित्र स्नानाचा घेणार लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

१४४ वर्षानंतर आलेल्या प्रयागराज येथील भव्य महाकुंभ मेळाचे आयोजन करण्यात आले. प्रयागराज येथील गंगा यमुना सरस्वती या तिनही नद्यांचा संगम असलेल्या त्रिवेणी संगमामध्ये आतापर्यंत जगातील कोट्यावधी भाविक भक्तांनी स्नान करून या पवित्र स्नानाचा लाभ घेतला त्या अनुषंगाने भारतीय संस्कृती व परंपरा जोपासून जनतेमध्ये वावरणारे बडनेरा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आ.रवि राणा व मा.खा.नवनित राणा हे सुद्धा प्रयागराज येथील सुरु असलेल्या महाकुंभ मेळामध्ये १२ ते १४ फेब्रुवारी असे ३ दिवस मुक्काम करणार असुन त्रिवेणी संगमामध्ये स्नान करून या पवित्र स्नानाचा लाभ



घेणार आहे.

तसेच या भव्य दिव्य महाकुंभ मेळामध्ये श्री.शिवमहापुराण कथावाचक श्री.प्रदिपजी मिश्रा यांच्या अमृतवाणीतून श्री.शिवमहापुराण कथेचे सुद्धा आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे श्री.शिवमहापुराण कथेमध्ये सुद्धा सहभाग घेवून व कथा ऐकण्याचा आस्वाद घेवून श्री.प्रदिपजी मिश्रा यांचा आशीर्वाद घेणार आहे.

# वन विभागात मनुष्यबळ पुरवणारी संस्था कुणाची ?

## नागपूरच्या वन भवनात 'त्या' अधिकाऱ्यांची 'पोस्टिंग पे पोस्टिंग'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

राज्याच्या वन विभागाचे मुख्यालय असलेल्या नागपूर येथील वन भवनाचा कारभार हल्ली सेवानिवृत्त अधिकारी हाकत असल्याचे वास्तव आहे. गतवर्षी जुलै २०२४ मध्ये चार सेवानिवृत्त विभागीय वनाधिकाऱ्यांच्या नियुक्तीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. मात्र शासन निर्णयाची तीन वर्षे अनुभवाची अट पूर्ण न करणाऱ्या अपात्र अधिकाऱ्यांना पुन्हा पोस्टिंग देण्यात आली. त्यामुळे वन विभागात मनुष्यबळ पुरवठा करणारी संस्था कुणाची? याबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

१७ डिसेंबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार सेवानिवृत्त वन अधिकाऱ्यांना पुन्हा कर्तव्यावर घेताना त्यांना तीन वर्षे अनुभवाची अट घातली आहे. मात्र नागपूर येथील वन भवनात आधीपासून कार्यरत काही सेवानिवृत्त विभागीय वन अधिकाऱ्यांनी देखील पुन्हा अर्ज भरले होते आणि पुन्हा त्यांनाच नियुक्त देण्यात आल्या. एवढेच नव्हे तर तेच काम पुन्हा देण्याचा वन विभागाने घाट घातला होता. जुलै २०२४ च्या जाहिरातीनुसार पात्र असलेल्या काही अर्जदारांना मुद्दाम डावलण्यात आले आणि आधीच कामावर असलेल्या मर्जीतील काहींना पुनःश्च




कर्तव्यावर घेतले.

वयाने अपात्र ठरलेले, ज्यांनी पासष्टी पार केली त्यांना पात्र करावे, यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवला. त्या प्रस्तावावर शासनाकडून मंजुरी न मिळाल्याने 'त्याच-त्या' मर्जीतील अधिकाऱ्यांची सेवा 'त्याच त्या' कामासाठी घेण्याची एका मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या संस्थेकडून करार तत्वावर बेकायदा सोय करून घेण्यात आली. त्यासाठी जुलै २०२४ मध्ये निविदा जाहिरात काढण्यात आली होती.

वन विभागासह अन्य विभागातही असाच सेवानिवृत्तांचे कामविना 'पोटभरण'सुरू आहे. या गंभीर प्रकारामुळे शासन तिजोरीवर मोठा आर्थिक ताण पडत आहे. या विषयाकडे वन मंत्री गणेश नाईक, वन खात्याचे सचिवांनी लक्ष देणे काळाची गरज आहे.जाहिरातीनुसार अनेक पदांपैकी एक पद सल्लागार / समन्वयक होते. ज्याची पात्रता विभागीय वन अधिकारी पदाचा केवळ एक वर्ष अनुभव असावा, अशी नमूद होती. मात्र त्यात 'सेवानिवृत्त' विभागीय वन अधिकारी असा उल्लेख नव्हता.

एक वर्ष अनुभव असलेला विभागीय वन अधिकारी अशी अर्हता असल्याच्या साहजिकच अटीनुसार केवळ सेवानिवृत्त अधिकारीच मिळणार होते. या जाहिरातीत सेवानिवृत्त विभागीय वन अधिकारी असा उल्लेख मुद्दामच टाळण्यात आला.

मर्जीतील लोकांना पुनःश्च कर्तव्यावर घेण्यात सामान्य प्रशासन विभागाचा १७ डिसेंबर २०१६ रोजीचा शासन निर्णय अडसर ठरत होता, त्यामुळे त्याचा अवलंब टाळता यावा यासाठीच ही खेळी करण्यात आली होती.

> राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या २०१६ च्या निर्णयानुसार सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची सेवा घेता येते. मात्र प्रशासन विभागात तशी कुणालाही नियुक्ती दिलेली नाही. वन भवनातील अन्य विभागाची मला माहिती नाही.
>
> **सी. श्रीनिवास राव**
> **प्रधान मुख्य वनसंरक्षक**
> **(कार्मिक व प्रशासन)**
> **वन विभाग.**

# नाफेड विक्रीसाठी शेतकरी वंचित; खरेदी-विक्री संघावर कारवाईची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

चांदूर बाजार तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीनची विक्रीसाठी आवश्यक कागदपत्रे चांदूर बाजार खरेदी-विक्री संस्थेकडे जमा केली होती. मात्र, ही कागदपत्रे वेळेत ऑनलाइन करण्यात आली नाहीत. परिणामी, शेतकऱ्यांना बाजारभाव मिळण्यापासून वंचित राहावे लागले. त्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी संस्थेवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

खरेदी-विक्री संस्थेकडून नाफेड अंतर्गत सोयाबीन खरेदी करण्यात येत आहे. यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीने आवारात जागा उपलब्ध केली. यासाठी तालुक्यातील रसुल्लापूर येथील शेतकरी अश्विन भेटाळू, नितीन भेटाळू व लीलाबाई भेटाळू यांनी १७ डिसेंबर २०२४ रोजी खरेदी-विक्री




संस्थेकडे सर्व कागदपत्रे जमा केली होती. त्यांचा अनुक्रमे ८४७, ८४८, ८४९ असून, खरेदी-विक्री संस्थेने त्यांच्या पुढील शेतकऱ्यांचे ऑनलाइन करून माल खरेदी सुद्धा केला. याबाबत संबंधित शेतकऱ्यांनी सहकार राज्यमंत्री, जिल्हा निबंधक कार्यालय व सहायक निबंधक कार्यालयात तक्रार दाखल केली. याप्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी त्यांनी केले. १७ डिसेंबर २०२४ मध्ये खरेदी-विक्री संस्थेकडे सर्व कागदपत्रे जमा केली होती. परंतू संस्थेनी ऑनलाइन केल्याचा आरोप आहे.

स्थानिक खरेदी-विक्री संस्थेत नाफेड खरेदीची अंतिम तारीख ६ फेब्रुवारी रोजी संपली. जवळजवळ ३०० शेतकऱ्यांची नोंदणी झाली नसल्याची माहिती आहे

**कापसासारखेच ठेवावे लागणार का साठवून?**

शेतकऱ्यांच्या कपाशीला फेब्रुवारी महिना लागला तरी हे पीक घरातच पडून आहे. जास्त दिवस झाल्याने आता अंग खाजवायला सुरुवात झाली आहे. सोयाबीनचेही तेच होणार का, असा प्रश्न विचारला जात आहे. सुरुवातीच्या काळामध्ये पिकाला भाव नसल्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या घरातच सोयाबीन ठेवले होते. शासकीय खरेदी सुरू झाल्याने अनेक शेतकऱ्यांनी आपल्या घरातील सोयाबीन हे विक्रीस काढले. परंतु नोंदणी होऊनही काहींना ते मुदतीत विकता आले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मार्केटमध्ये भाव नाही, नाफेडचे पोर्टल बंद झाले आहे. त्यामुळे घरातील सोयाबीनचे काय करावे, हा प्रश्न निर्माण झाला आहे.

**शेतकऱ्यांचे क्विंटलमागे हजार रुपयांचे नुकसान**

सरकारी हमीभाव सोयाबीनसाठी ४,५०० ते ५,००० रुपये प्रतिक्विंटल निश्चित करण्यात आला होता. मात्र, संस्थेच्या दिरंगाईमुळे अनेक शेतकऱ्यांना खासगी व्यापाऱ्यांना केवळ ३,५०० ते ४,००० रुपये दराने सोयाबीन विक्री करावी लागली. यामुळे शेतकऱ्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे. यामध्ये उत्पादन खर्चही पदरी पडत नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली.

# भरधाव कार अनियंत्रित होऊन कालव्यात कोसळली

## हायवेवरील तिवसा-मोझरी दरम्यान घटना : कारचालक अपघातात गंभीर जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०तिवसा**

अमरावती-नागपूर राष्ट्रीय महामार्गाने जाणारी भरधाव हुंडाई कार अचानक तिवसा ते मोझरी, दरम्यान असलेल्या कालव्याजवळ अनियंत्रित झाली व काही क्षणात तुडुंब पाण्याने भरलेल्या कालव्यात कोसळली. ही घटना रविवारी रात्री ११ वाजताचे सुमारास घडली. अपघातात कारचालक गंभीर जखमी झाला असून अपघातग्रस्त कारचे मोठे नुकसान झाले आहे. प्राप्त




माहितीनुसार, गगन सुनील ठाकूर(वय ३०,रा.आर्वी) हे अमरावती-नागपूर राष्ट्रीय महामार्गाने कार क्रमांक चक २७,इन-७१८८ ने भरधाव जात होते.दरम्यान ही भरधाव कार तिवसा ते मोझरी, कालव्याजवल आली असता अचानक वाहनवरील नियंत्रण सुटले व पाहता-पाहता भरधाव कार काळव्याजवळील भिंतींला धडकून कालव्यात कोसळली. मात्र त्यापूर्वीच कार चालक भरधाव कारमधून बाहेर पडल्याने घडलेल्या अपघातात बचावला असला तरी, अपघातग्रस्त कार समोरील भाग पूर्णता क्षितीग्रस्त होऊन ही कार पाण्यावर तरंगत समोरील पाईपलाईनला अडकली असल्याचे दिसताच क्रेनच्या साहाय्याने वाहणाऱ्या कालव्यातून रात्री १२ ते १ वाजताच्या सुमारास कार बाहेर काढण्यात पोलीस, व आयआरबी प्रशासनाला यश आले आहे. जखमी कार चालकाला उपचारार्थ तिवसा येथील उपजिल्हा रुग्णालयातून अमरावती येथे दाखल करण्यात आले. तिवसा पोलिसांनी अपघाताची नोंद घेतली असून पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहे.

# कृषि प्रदर्शनीमध्ये नागरिकांनी सहभाग नोंदवावा - जिल्हाधिकारी सौरभ कटियार

## पाच दिवसात कृषिज्ञान, सांस्कृतिक कार्यक्रमांची राहणार रेलचेल : मिर्झा एक्सप्रेस, सुर नवा ध्यास नवा, हास्याचे तिखे बोल आकर्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

आत्माच्या वतीने पाच दिवसांची कृषि प्रदर्शनी आयोजित करण्यात आली आहे. यात कृषि विषयक आधुनिक तंत्रज्ञानाची माहितीही मिळणार आहे. त्यामुळे नागरिकांनी कृषि प्रदर्शनीमध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.

आज जिल्हाधिकारी कार्यालयात कृषि प्रदर्शनीच्या आयोजनाबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, आत्माच्या प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने आदी उपस्थित होते.कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणेमार्फत दि. १४ ते १८ फेब्रुवारी दरम्यान



सायन्सस्कोर मैदानावर कृषि विकास परिषद व प्रदर्शनी आयोजित करण्यात आली आहे. सकाळी दहा ते रात्री दहा वाजेपर्यंत कृषि विषयक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनीत धान्य, खाद्य, सेंद्रिय शेतमाल, शासकीय योजनांची माहितीसाठी स्टॉल राहणार आहे. तसेच आधुनिक शेती तंत्रज्ञानासाठी कृषिला लागणाऱ्या मशिनरी आणि औजारांचे प्रदर्शन राहणार आहे.प्रदर्शनी दरम्यान दि. १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता मिर्झा एक्सप्रेस फेम डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांचा विनोदी कार्यक्रम, दि. १६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता कलर्स मराठी टीव्ही फेम साहिल पांढरे यांचा सुर नवा ध्यास नवा, चला हवा येऊ द्या फेम प्रविण तिखे यांचा हास्याचे तिखे बोल हे सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. प्रदर्शनीत २०० स्टॉल राहणार आहे. यात ४० शासकीय विभागांचे स्टॉल राहणार आहे. यातून नागरिकांना शासकीय योजनांची माहिती देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे प्रदर्शनीच्या ठिकाणी सुरक्षा, आरोग्य पथक तैनात राहणार आहे.कृषि प्रदर्शनीचे आयोजन मोठ्या स्वरूपात करण्यात आले आहे. यासाठी कृषि विभागाच्या सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी मेहनत घ्यावी. प्रदर्शनीच्या ठिकाणी सुरक्षा, अग्निशमन, पिण्याच्या पाण्याची सोय, फिरते शौचालय, वैद्यकीय सुविधा देण्यात यावा. विद्यार्थ्यांमध्ये जागृती होण्यासाठी याठिकाणी शाळांच्या सहली आयोजित करण्यात याव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी दिले.